गर्मी में भी सर्दी का मजा
COMPRO Systems & Services
कुलर, ए.सी., फ्रीज — सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स — HDB FINANCIAL SERVICES, BAJAJ FINSERV
● वॉशिंग मशिन ● एलईडी टीव्ही ● होमथिएटर ● मोबाईल ● होम अप्लायन्सेस
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar — PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202 — पार्सल सुविधा उपलब्ध..

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०४.०६.२०२५ | अंक नं. ५५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल... सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी — खरेदीवर पॉइंट — पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा राजपाल™
संगमनेर (02425) 222226 | अ. नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
चंदुकाका ज्वेल्स — सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

## नगरमध्ये एसटी बसचालकास लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण

**कोठला चौकातील घटना, आरोपी तरुणाला पोलिसांनी ठोकल्या बेड्या**

नगर – रस्त्यात असलेली मोटारसायकल बाजूला घे असे म्हटल्याचा राग आल्याने एका तरुणाने एसटी बस चालकास शिवीगाळ दमदाटी करीत लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना शहरातील कोठला चौकातील मिलिटरी गुरुद्वारासमोरील रोडवर ३ जून रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी गुन्हा दाखल होताच पोलिसांनी रात्री आरोपी तरुणाला अटक केली आहे.

याबाबत एसटी बस चालक रमेश दत्तू झाडे (वय ४९, रा. चिंचोली, ता.सिन्नर, नाशिक) यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे नाशिकच्या पंचवटी डेपोची नाशिक – तुळजापूर एसटी बस (क्र. एम एच १४ एक्सएल ६७३७) ही घेवून नगरच्या तारकपूर बसस्थानक येथे आले, तेथे प्रवासी सोडून माळीवाडा बसस्थानक येथे जात असताना कोठला चौकाजवळील मिलिटरी गुरुद्वारासमोर आले असता त्यांच्या एसटी बसच्या पुढे अजय रविंद्र पेटारे (वय २१, मूळ रा. पिंपरी निर्मळ, राहता. हल्ली रा. हॉटेल दोस्तीच्या मागे, तपोवनरोड अ.नगर) हा त्याची मोटारसायकल (क्र. एम. एच. १६ डी. ९९२२) घेऊन थांबलेला होता. त्यावेळी फिर्यादी यांनी पेटारे यास तुझी मोटारसायकल रस्त्यातून बाजूला घे असे म्हटले. याचा राग आल्याने त्याने फिर्यादीस शिवीगाळ दमदाटी करीत लाथाबुक्क्याने मारहाण केली. तसेच एसटी बसची चावी काढून डोक्यात मारुन दुखापत करुन फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला. यावेळी होत असलेले भांडण सोडवण्याकरिता एसटी वाहक हे मध्ये आले असता या गडबडीत त्यांच्या खिशातील प्रवाशांचे तिकिटाचे ७ हजार ५० रुपये खाली पडून गहाळ झाले असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात बस चालक रमेश झाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मोटारसायकलस्वार अजय पेटारे याच्याविरुद्ध बी एन एस कलम १३२, १२१ (२), ३२४ (२), ३५१ (२) (३), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यावर पोलिसांनी रात्री १०.३४ वाजण्याच्या सुमारास आरोपी अजय पेटारे यास अटक केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गर्जेंद्र इंगळे हे करीत आहेत.

## कारागृहात २ कैद्यांकडून एकाला बेदम मारहाण

नगर – न्यायालयीन कोठडीत पोलिस लॉकअप मध्ये असलेल्या २ कैद्यांनी एका कैद्याला बेदम मारहाण करत त्याचा दात पाडत गंभीर दुखापत केल्याची घटना पारनेर येथील लॉकअप मधील बराक क्र. ४ मध्ये २ जून रोजी रात्री १०.४५ च्या सुमारास घडली.

याबाबत कैदी सुभाष बबन करगळ (वय ३५, रा. गाजदीपूर, ता.पारनेर) याने पारनेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हा विनयभंग आणि पोक्सोच्या गुन्ह्यात पोलिस लॉकअप मधील बराक क्र. ४ मध्ये न्यायालयीन कोठडीत बंदी आहे. त्याच बराकमध्ये त्याच्या पूर्वीपासून एका गुन्ह्यात प्रणय अरविंद खंडागळे (वय २०, रा.सुपा, ता.पारनेर) आणि ऋषिकेश गणेश खामकर (वय २१, रा.पानोली, ता.पारनेर) हे दोघे न्यायालयीन कोठडीत बंदी आहेत.

या दोघांनी २ जून रोजी रात्री १०.४५ च्या सुमारास सुभाष करगळ यास बाथरुम घासायला लावले. त्यावरून त्यांच्यात वाद झाले. त्यामुळे या दोघांनी करगळ यास लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तोंडावर बुक्क्यांनी मारल्याने त्याचा एक दात पडला. तसेच तो जखमी झाला. हा प्रकार लॉकअप गार्ड नेमणुकीस असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी सुभाष करगळ याची दोघांच्या तावडीतून सुटका केली.

याबाबत सुभाष करगळ याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी प्रणय खंडागळे व ऋषिकेश खामकर या दोघांच्या विरुद्ध बी.एन.एस. कलम ११७ (२), कारागृह अधिनियम सन १८९४ चे कलम ४५, ४६ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## जिल्ह्याच्या काही भागात ४ ते ७ जून दरम्यान पाऊस

नगर – जिल्ह्याच्या काही भागात दि. ४ ते ७ जून या कालावधीत वीजांच्या कडकडाटासह वादळे, हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची हवामान खात्याने शक्यता वर्तवली आहे. जिल्ह्यासाठी पिवळा इशारा (यलो अलर्ट) जारी करण्यात आलेला आहे. नागरिकांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबकळणाऱ्या केबल्स पासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.

धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी (Selfie) काढू नये. वादळी वारा, पाऊस व गारपीट यामुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे.

शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

वादळी वारे, वीज, पाऊस आणि गारपीट यांपासून स्वत:सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन किंवा जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथील दूरध्वनी क्र. १०७७ (टोल फ्री), ०२४१- २३२३८४४ अथवा २३५६९४० या क्रमांकावर संपर्क साधावा.

## शनिशिंगणापूर देवस्थानच्या बनावट ॲप घोटाळ्याची मोठी व्याप्ती; सखोल चौकशी करून कारवाई करा

### पोलीस अधीक्षकांकडे मागणी

नगर – शनिशिंगणापूर येथील भगवान शनि देवांच्या ऑनलाइन पूजा व तेल अर्पणासाठी शनैश्वर देवस्थानच्या अधिकृत ॲप ऐवजी तेथील काही कर्मचाऱ्यांनी बनावट ॲप तयार करून भक्तांकडून कोट्यावधी रुपयांची देणगी लाटली आहे. भाविकांच्या भावनांशी संबंधित कर्मचाऱ्यांनी खेळ करून फसवणूक केली आहे. या भ्रष्ट कर्मचाऱ्यांचा तातडीने शोध घेऊन त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करावी. तसेच त्यांच्या संपत्तीची व मालमत्तेची चौकशी करून कडक शासन करावे. पोलीस प्रशासनाने जर तातडीने कारवाई केली नाही तर या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल, असा इशारा भाजपचे विशाल सुरपुरीया यांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना दिलेल्या निवेदनामध्ये दिला आहे.



शनिशिंगणापूर देवस्थानमधील बनावट ॲप घोटाळ्याची चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी विशाल सुरपुरिया यांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे केली. यावेळी गौरव गुगळे उपस्थित होते.

शनि शिंगणापूर येथील शनैश्वर देवस्थानच्या ऑनलाईन देणगीसाठी वापरण्यात येणाऱ्या मोबाईल ॲपचा कोट्यावधी रुपयांचा घोटाळा नुकताच उघडकीस आला आहे. मात्र अद्याप कोणावरही कारवाई झालेली नाही. त्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्या संबधित कर्मचाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कायद्याने कारवाई करण्याची मागणी शनिसाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष विशाल सुरपुरीया यांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे दिलेल्या निवेदनात केली आहे. यावेळी सिए गौरव गुगळे उपस्थित होते. सुरपुरिया यांनी दिलेल्या निवेदना बरोबर बनावट ॲपचे पुरावे जोडले आहेत.

विशाल सुरपुरीया यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, शनिशिंगणापुर हे भारतातील खुप मोठे देवस्थान असून सर्व शनिभक्तांचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे लाखो भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. सध्याच्या धावपळीच्या काळात सर्व भाविकांना प्रत्याक्षात येथे येऊन पूजा व तेल अर्पण करणे शक्य नसल्याने देवस्थाने आधुनिक काळा बरोबर चालत ऑनलाईन पूजाविधी साठी व देणगीसाठी एका मोबाईल ॲपची निर्मिती केली होती. याबाबत मला माहिती मिळाली असता मी जेव्हा मोबाईलमध्ये सादर ॲप डाऊनलोड केले त्यावेळी देवस्थानच्या अधिकृत ॲप एवजी अनेक बोगस ॲप दिसले. देवस्थानने अधिकृत ॲप आधीच बंद केले असून तसे जाहीरही केले आहे. त्यामुळे ऑनलाईन पूजाविधी साठी भाविक अद्यापही सदर बनावट ॲपचा वापर मोठ्याप्रमाणात करत आहेत. या बनावट ॲपची निर्मिती देवस्थान मधील काही कर्मचाऱ्यांनी केली आहे. या प्रकरणामध्ये देवस्थानातील कर्मचारी व वरिष्ठ अधिकारी वर्ग सामील आहेत.

सदर बनावट ॲपचे सदस्य सुमारे २ ते ३ लाखांपेक्षा जास्त असून त्याद्वारे शनिभक्तांकडुन आकारली जाणारी प्रती पूजा व तेल अर्पण सेवे पोटीची रक्कम रु. १५०० ते २००० गृहीत धरल्यास कमीत कमी ४०० ते ५०० कोटी रुपयांची लुट सदर बोगस पद्धारे शनिभक्तांची झालेली आहे. हे ॲप अद्यापही सुरु असल्याने भोळ्या भाबड्या शनिभक्तांची लूटमार करून मोठा विश्वासघात होत आहे.

वरील परिस्थितीचे अवलोकन करुन श्री शनैश्वर देवस्थानच्या नावाने खोटे व बोगस पची निर्मिती करुन त्याद्वारे ४०० ते ५०० कोटी रुपयांची आर्थिक लुट व अपहार झाल्याबाबत देवस्थानची, देवस्थानामधील सर्व कर्मचारी व सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करावी. तसेच सर्वांच्या संपत्तीची व मालमत्तेचीही चौकशी करुन संबंधित ॲप निर्मितीमध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करुन संबंधितांना कठोर शासन करावे, अशी मागणी केली आहे.

## घर खरेदी करुन देण्याच्या बहाण्याने १७ लाख रुपयांची फसवणूक

नगर – नवीन रो हाऊस खरेदी करुन देतो असे सांगून विश्वास संपादन करुन वेळोवेळी चेकद्वारे पैसे घेऊन, घर घेऊन न देता, तसेच दिलेले पैसेही माघारी न देता एकाची १७ लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. फसवणूक केली. हा प्रकार २९ सप्टेंबर २०१६ ते १६ मार्च २०२४ या कालावधीत आलमगीर, भिंगार येथे घडली.


याबाबत रज्जाक महबूब इनामदार (वय ५४, रा. निसर्ग सोसायटी, बाणेर, पुणे) यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात ३ जून रोजी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे नोकरीनिमित्त पुण्यात वास्तव्यास होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांना त्यांच्या गावी भिंगार, आलमगीर येथे नवीन घर घ्यायचे असल्याने त्यांनी त्यांच्या ओळखीचे अली अकबर सलीम कुरेशी (रा. इदगाह मैदानजवळ, नागरदेवळे, ता. नगर) यास सांगितले असता कुरेशी याने माझ्या ओळखीचे आयेशा डेव्हलपर्स आहे. मी त्यांच्याकडे चौकशी करुन तुम्हाला चांगले घर घेऊन देतो. असे सांगून इनामदार यांच्याकडून वेळोवेळी चेकद्वारे १७ लाख रुपये घेतले. तुम्हाला सहा महिन्यात घर घेऊन देतो, असे सांगितले. त्यानंतर सहा महिन्याची मुदत संपल्याने फिर्यादी यांनी कुरेशी यास घराबाबत चौकशी केली असता त्याने घर देण्यास टाळाटाळ केली. तसेच घेतलेले पैसेही माघारी देण्यास टाळाटाळ केली. यावरुन आपली फसवणूक झाली असल्याचे फिर्यादी यांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी रज्जाक इनामदार यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन अली अकबर कुरेशी याच्याविरुद्ध भारतीय दंड विधान कायदा कलम ४२० प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक फौजदार रेवणनाथ दहिफळे करीत आहेत.

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES — Since 1965
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
"मुसाफिर"–९८२२०२०६९१



### भगवान श्रीकृष्ण व वर्तमान

कृष्ण आज भारतीय जनमानसात व्यापक स्तरावर देवत्त्वाला पोहोचलेलं व्यक्तिमत्त्व आहे. ज्या काळात तो प्रत्यक्ष वावरत होता, तेव्हा सामान्य मानवी नाती, कर्तव्य व स्वधर्म निभावत होता तेव्हा तो देवकीचा पुत्र, अर्जुनाचा मित्र, यदुकुलातला महापराक्रमी पुरुष म्हणूनच ओळखला जात असेल ना?

सगुण भक्तीचा काळ जेव्हा सुरू झाला, मानवाला जेव्हा देवत्त्व द्यायला सुरुवात झाली तेव्हा मग आदर्श व्यक्तींना देव मानणं आणि व्यक्तीची पूजा करणं सुरू झालं अन् रामकृष्णाची घरोघरी पूजा होऊ लागली.

त्या मनमोहक, वेडावणाऱ्या कृष्णाचे रूप द्वारका, गोकुळ, जगन्नाथपुरी, पंढरपूर, तिरुपती अशा अनेक ठिकाणी भाविक भक्तांद्वारे पूजिले जातात. खरंतर श्रीकृष्णाचे आदर्श जीवन आपल्याला आयुष्य कसे असावे, कसे जगावे व कार्यसिद्धांत शिकवते. फक्त आपण श्रद्धेने, डोळसपणे ते शिकायची, अंगीकारण्याची भावना हवी.

याशिवाय आपणही कोणाला तरी आपला सहृदय, हितचिंतक, जीवलग मानत असतोच. आपल्यासारखंच दुसरी व्यक्ती दुसऱ्या कुणालातरी आदर्श ठरवत असतोच.

पण आजची परिस्थिती काय आहे? सामाजिक आचार, विचार, आदर्श गढूळ बनलेत. स्वार्थांध, भ्रष्टाचाराच्या हलकल्लोळात मानसिक व सामाजिक स्वास्थ विलक्षण बिघडलंय. आत्महत्या, बलात्कार, जातीद्वेष लक्षणीय वाढलेत.

आर्थिक विकासासह मानसिक, सामाजिक नैतिकता, विकास झाला नाही तर...

## नागरदेवळे परिसरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – १५ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचेतरी आमिष दाखवून, फूस लावून तिचे अपहरण केल्याची घटना ३ जून रोजी दुपारी नगर तालुक्यातील नागरदेवळे परिसरात घडली. अल्पवयीन मुलगी उशिरापर्यंत घरी न आल्याने तिच्या घरच्यांनी तिचा नागरदेवळे परिसर, भिंगार परिसर, तिच्या मैत्रिणीकडे, तसेच नातेवाईकांकडे संपर्क करुन शोध घेतला असता ती कोठेही मिळून आली नाही. यावरुन तिचे कोणीतरी अपहरण केले असल्याचा संशय व्यक्त करत तिच्या वडिलांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध बी एन एस कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक निसार शेख करीत आहेत.

## विजेचा शॉक बसून महिलेचा मृत्यू


सुजाता भापकर

नगर – पहाटे उठून जनावरांसाठी चारा कापण्यासाठी गोठ्यात कडबाकुट्टी मशीन चालू करायला गेलेल्या महिलेचा विजेचा शॉक बसून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील गुंडेगाव शिवारातील हराळमळा येथे ३ जून रोजी सकाळी घडली. सौ.सुजाता संभाजी भापकर (वय ३६) असे मयत महिलेचे नाव आहे.

सुजाता भापकर यांना विजेचा शॉक बसून त्या बेशुध्द पडल्याने निदर्शनास येताच त्यांचे पती माजी सैनिक संभाजी तुकाराम भापकर यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविले. तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ.बटूळे यांनी त्यांना तपासून त्या उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले. या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मयत सुजाता भापकर यांच्यावर हराळमळा येथे दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यापश्चात पती, १ मुलगा, १ मुलगी, सासू सासरे असा परिवार आहे.

## प्रल्हाद सुरतवाले यांचे अल्प आजाराने निधन



नगर – भोसले आखाडा येथील रहिवासी प्रल्हाद निवृत्ती सुरतवाले (वय ५२) यांचे ३ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर ४ जून रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## कौसल्याबाई गोरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – लेंडकर मळा परिसरातील रहिवासी कौसल्याबाई मनोहर गोरे (वय ८२) यांचे ४ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ४ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. वृत्तपत्र विक्रेते राजेंद्र गोरे व वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे खजिनदार संजय गोरे यांच्या त्या मातोश्री होत.

## सौ.वैजंता पोपळघट यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील सौ.वैजंता सुखदेव पोपळघट (वय ५३) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे.

सुतार कारागीर सुखदेव मनाजी पोपळघट यांच्या पत्नी, सोमनाथ पोपळघट व रिक्षाचालक सागर पोपळघट यांच्या मातोश्री होत.

# 'लाडकी बहीणी'चा लाभ घेणाऱ्या सरकारी कर्मचारी व त्यांना मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाईची मागणी

नगर – महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहीण या महत्त्वाकांक्षी आणि महिलांसाठी क्रांतिकारी ठरलेल्या योजनेत मोठा गैरप्रकार समोर आला आहे. या योजनेचा लाभ २२०० पेक्षा अधिक सरकारी कर्मचाऱ्यांनी घेतल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी जाहीरपणे कबूल केले आहे. यामुळे शासनाच्या शेकडो कोटींच्या निधीचा गैरवापर झाल्याचे स्पष्ट होत असून या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन फौजदारी कारवाई करण्याची मागणी ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. सुरेश लगड यांनी थेट मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे.


ॲड. सुरेश लगड

महाराष्ट्र शासनाने महिलांना आर्थिक मदतीसाठी सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेत दरमहा १५०० रुपये थेट बँक खात्यात जमा होतात. मात्र, अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या महिलांनाही या योजनेचा लाभ मिळाल्याचे उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे अनेक सरकारी कर्मचारी महिलांनी नियमांचे उल्लंघन करून आपले उत्पन्न लपवून लाभ घेतल्याचे आता स्पष्ट झाले आहे.राज्य शासनाने अर्जांची छाननी सुरू केली असून, आयकर विभागाच्या मदतीने लाभार्थ्यांचे प्रत्यक्ष उत्पन्न तपासले जात आहे. या तपासणीत बोगस लाभार्थ्यांचा पर्दाफाश होण्याची शक्यता असून, लाभार्थ्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात घटण्याची शक्यता आहे.

सरकारी कर्मचारी ही योजना स्वतःसाठी वापरून शासनाच्या निधीची फसवणूक करत आहेत. केवळ त्यांनीच नव्हे, तर त्यांना सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांचीही जबाबदारी आहे. हा प्रकार म्हणजे शासनाची फसवणुक आहे. यावर सरकारने तातडीने फौजदारी कारवाई करावी, असे ॲड. सुरेश लगड यांनी म्हंटले आहे.

## राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना जूनपासून ५३ टक्के महागाई भत्ता : उपमुख्यमंत्री

मुंबई – राज्यातील राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना मुळ वेतनावर जून २०२५ पासून ४६ टक्के ऐवजी ५३ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केली. महामंडळातील कर्मचाऱ्यांना महात्मा फुले जनआरोग्य योजना किंवा धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना यापैकी एक निवडण्याचा पर्याय, एक कोटी रुपयांचे अपघाती विमा कवच लागू करण्याचा तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मोफत प्रवास पास नऊ ऐवजी १२ महिन्यासाठी देण्याचा निर्णयही उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर केला.

सह्याद्री अतिथीगृह येथे एसटी महामंडळाच्या विविध संघटनांच्या प्रतिनीधींची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सदाभाऊ खोत, माजी खासदार आनंदराव अडसुळ, कॅप्टन अभिजीत अडसूळ, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महामंडळाचे उपाध्यक्ष माधव कुसेकर यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, सामान्यांसाठी जीवनवाहिनी असलेल्या एसटीच्या बससेवेच्या माध्यमातून लोकांना अपेक्षित अशी चांगली सेवा मिळाली पाहिजे. बसगाड्या सोबतच बसस्थानके देखील स्वच्छ असली पाहिजे. स्वच्छतागृह, विश्राम कक्ष यांच्या स्वच्छतेसाठी प्राधान्य दिले पाहिजे. एसटीच्या माध्यमातून कार्गो सेवा सुरू करण्यावर भर देण्याचे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. बसस्थानके हे बस पोर्ट झाली पाहिजे असे सांगत एसटी तोट्यातून वर कशी काढता येईल याचा अभ्यास करा. एसटीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे यासाठी प्रयत्न करण्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले.

यावेळी संघटनांच्या प्रतिनीधींनी विविध मागण्या केल्या. एसटीची उत्पन्न वाढ, इंधन बचत, यावरही चर्चा झाली. महामंडळातील कर्मचाऱ्यांना मुळ वेतनावर ४६ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येत आहे. जून २०२५ च्या वेतनापासून मुळ वेतनावर ५३ टक्के महागाई भत्ता अदा करण्यात येणार आहे. महागाई भत्त्याच्या थकबाकीबाबत निधीची उपलब्धता पाहून निर्णय घेण्यात येईल, असे यावेळी त्यांनी सांगितले.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेअंतर्गत कर्मचाऱ्यांना पाच लाखापर्यंत कॅशलेस वैद्यकीय लाभ उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्याचबरोबर धर्मवीर आनंद दिघे वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना देखील सुरू करण्यात आली आहे. या दोन्ही पैकी एक योजना निवडण्याचा पर्याय कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना स्टेट बँकेमार्फत अपघाती विमा कवच लागू करण्याबाबत बँकेशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. ज्या कर्मचाऱ्यांचे वेतन खाते स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेमध्ये आहेत अशा कर्मचाऱ्यांना कामगिरीवर असताना– नसताना (दोन्ही प्रकरणी) अपघात झाल्यास विमा कवच लागू करण्यात येत आले आहे. त्यामध्ये वैयक्तिक अपघातात निधन झाल्यास एक कोटी, पुर्णतः अपंगत्व आल्यास एक कोटी, अंशतः अपंगत्व आल्यास ८० लाख रुपयांपर्यंत विमा रक्कम दिली जाईल.

एसटीच्या सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना व त्यांच्या पत्नीला वर्षभर एसटीतून मोफत प्रवास करण्याचा पास देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी केली. याचा लाभ सुमारे ३५ हजार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना होणार आहे.


भाजपच्या प्रदेश कार्यलयात स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना अहिल्यानगरचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते. शेजारच्या छायाचित्रात जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे यांनी नवनियुक्त शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांचा मुंबईत सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी अशोकराव गायकवाड, धनंजय जाधव व निखिल वारे.

## महापालिकेच्या निवडणुकीच्या तयारीला लागा : पालकमंत्री विखे

### अनिल मोहिते यांचा मुंबईत सत्कार

नगर – भाजपच्या अहिल्यानगर शहर जिल्हाध्यक्षपदी पक्षाचे व संघाचे अनुभवी कार्यकर्ते अनिल मोहिते यांची निवड केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे काम अधिक वाढेल. आता लवकरच महापालिकेच्या व इतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लागणार आहेत. भारतीय जनता पक्ष पूर्ण ताकदीने या निवडणुका लढणार आहे. त्यामुळे अहिल्यानगर शहरातून महानगरपालिकेच्या निवडणुकीची जोरदार तयारी करा. शहरात पक्षाचे उत्कृष्ट काम सुरु आहे ते अजून वाढवा, अशा शब्दात जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी अनिल मोहिते यांना शुभेच्छा दिल्या.

अनिल मोहिते यांचा मुंबईत मंत्री राधाकृष्ण विखे यांनी सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी शहर पदाधिकारी अशोकराव गायकवाड, धनंजय जाधव व निखिल वारे उपस्थित होते.

लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथी निमित्त मुंबई येथे भाजपच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात त्यांच्या प्रतिमेस अनिल मोहिते यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी अनिल मोहिते म्हणाले, महाविद्यालयीन काळापासून स्व.गोपीनाथ मुंडे यांचा सहवास मला लाभला आहे. त्यावेळी स्व.राजाभाऊ झरकर यांच्या लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रचार सभेत भाषण करण्याची संधी मला मिळाली होती. से.मुंडे यांचे विचार व कार्यावर पक्षाचे संघटनात्मक काम करणार आहे, असे सांगून मंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिलेल्या शुभेच्छा व केलेला सत्कार हुरूप व उत्साह वाढवणारा आहे. पक्षाने माझ्यावर मोठा विश्वास व्यक्त करत जबाबदारी दिली आहे. ती निष्ठेने निभावत सर्वांना बरोबर घेत काम करणार आहे, असे सांगितले.

# अहिल्यानगर महापालिकेच्या कामकाजाचा जिल्हाधिकारी तथा आयुक्तांनी घेतला आढावा

### नागरिकांना तातडीच्या सेवा देण्याचे निर्देश

नगर – महानगरपालिकेच्या विविध विभागांची आढावा बैठक जिल्हाधिकारी तथा प्रभारी महापालिका आयुक्त पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या बैठकीत त्यांनी सर्वच विभाग प्रमुखांकडून चालू असलेल्या योजनांची व प्रकल्पांची सविस्तर माहिती घेतली. बैठकीदरम्यान, पंकज आशिया यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, नागरिकांना महापालिकेच्या माध्यमातून मूलभूत सुविधा तातडीने आणि प्रभावी पद्धतीने मिळणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक विभागाने आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करणे गरजेचे आहे. महापालिकेची जबाबदारी केवळ विकास कामे करणे इतकीच नाही, तर ती कामे वेळेत आणि दर्जेदार रितीने पूर्ण होणे ही देखील तितकीच महत्त्वाची आहे. विभाग प्रमुखांना सूचना देत असताना सांधितले की, नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर त्वरित कृती केली जावी, असे आदेश जिल्हाधिकारी तथा आयुक्त पंकज आशिया यांनी यावेळी दिली.


महापालिकेच्या कामकाजाचा जिल्हाधिकारी तथा आयुक्त पंकज आशिया यांनी आढावा घेतला. (छाया – लहू दळवी)

यावेळी आरोग्य, जलपुरवठा, स्वच्छता, बांधकाम, करसंकलन, विद्युत, बागकाम, नागरी सुविधा, मालमत्ता व्यवस्थापन, वसुली, शिक्षण आदी विभागांतील कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक विभाग प्रमुखांनी आपापल्या क्षेत्रातील प्रगती अहवाल सादर करताना येणाऱ्या अडचणी व पुढील उपाययोजना देखील मांडल्या. जिल्हाधिकारी आशिया यांनी स्पष्ट निर्देश दिले की, कामांमध्ये पारदर्शकता आणि गती येणे आवश्यक आहे. नागरिकांची सेवा हीच आपली सर्वोच्च प्राधान्यक्रम असावी. त्यामुळे प्रत्येकाने आपली जबाबदारी पूर्ण निष्ठेने पार पाडावी.

या बैठकित उपायुक्त विजय मुंढे, डॉ.संतोष टेंगळे, सहायक आयुक्त सपना वसावा, निखिल फराटे, जल अभियंता परिमल निकम, आस्थापणा विभाग प्रमुख मेहेर लहारे, शहर अभियंता मनोज पारखे, श्रीकांत निंबाळकर, अतिक्रमण विभाग प्रमुख सुरेश इथापे, घनकचरा विभाग प्रमुख अशोक साबळे, प्रसिध्दी अधिकारी शशिकांत नजन, संगणक विभाग प्रमुख अंबादास साळी, सर्व प्रभाग अधिकारी आणि विभाग प्रमुख आदी उपस्थित होते.

## काटवन खंडोबा रोडवर वाहतेयं ड्रेनेजचे पाणी, सर्वत्र दुर्गंधी पसरुन आरोग्याचा प्रश्न गंभीर

नगर – शहरातील काटवन खंडोबा रोड येथील रस्त्याचे काम सप्तपदी मंगल कार्यालय येथे मागील तीन महिन्यांपासून थांबले आहे. ३ महिन्यांपासून रस्ता खणून ठेवल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तर जेसीबीने रस्ता खोदताना ड्रेनेजलाईन फुटल्याने सर्व घाण पाणी रस्त्यावरुन वाहत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरुन नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या भागात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती असून, लवकरच शाळा व पावसाळा देखील सुरु होत आहे. ठप्प झालेले काम तात्काळ सुरु करण्यासाठी नागरिकांमधून मागणी होत आहे. पावसाळा सुरु झाल्यास नागरिकांना पलीकडील भागात जाण्यास रस्ता असून देखील तो रहदारीसाठी बंद होणार आहे. तसेच शालेय विद्यार्थी व महिला वर्गाला देखील या रस्त्यावरुन वाट काढताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे. महापालिका प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन रस्त्याचे राहिलेले शेवटच्या टप्प्यातील काम पूर्ण करण्याची नागरिकांच्या वतीने मागणी करण्यात आली आहे.


काटवन खंडोबा रोडवर ड्रेनेजचे पाणी वाहत असून सर्वत्र दुर्गंधी पसरुन आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

## आमदार निधीतून बनवलेला रस्ता कुठलीही परवानगी न घेता पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी खोदला

### प्रशासनाचा भोंगळा कारभार; मनपाने रस्ता बनवून देण्याची विजय गव्हाळे यांची मागणी

नगर – रेल्वे स्टेशन भेवरी चाळ गवळीवाडा येथे माजी नगरसेवक विजय गव्हाळे यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून सहा महिन्यापूर्वी संपूर्ण रस्ता काँक्रिटीकरण केला तेव्हा महापालिकेच्या पाणीपुरवठा विभाग व इतर विभागाने जमिनीखालची कामे केलेली होती व आता पूर्ण झालेल्या रस्ता अचानकपणे कुठलीही परवानगी न घेता रस्ता खोदण्यात आला. या अशा मनपा प्रशासनाच्या भोंगळ्या कारभारामुळे रस्त्याचे विद्रूपीकरण होत आहे. याला थांबवण्यासाठी प्रशासनाने कारवाई करण्यात यावी व रस्ते होण्यापूर्वीच कामे पूर्ण करण्यात यावी.


अचानकपणे कुठलीही परवानगी न घेता रस्ता खोदण्यात आलेला आमदार निधीतून बनवलेला रस्ता.

शहरांमध्ये सध्या आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून शहरांमध्ये विकास होत आहे व हे रस्ते पूर्ण तत्वावर झाले की मनपा प्रशासनाच्या पाणीपुरवठा विभाग हा रस्ता खोदून पाईपलाईनचे काम करते मात्र या रस्त्याचे विद्रूपीकरण होऊन मोठ्या खड्ड्यात रूपांतर होते. यामध्ये कोणतीही दुर्घटना घडते. त्यामुळे रस्ता होण्यापूर्वी मनपा प्रशासनाने कामे पूर्ण करावी व जिथे रस्ता खोदण्यात येईल तेथे रस्ता बनवून देण्याची मागणी माजी नगरसेवक विजय गव्हाळे यांनी केली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### दातांची राखा निगा

घरगुती हर्बल दंत मंजन म्हणजे दातांसाठी नैसर्गिक आणि पारंपरिक पद्धतीने तयार केलेले मंजन. यात विविध औषधी वनस्पती, जसे की कडुनिंब, आवळा, लवंग, दालचिनी, हळद आणि सैंधव मीठ वापरले जातात. हे मंजन दात आणि हिरड्यांसाठी चांगले असते, तोंडातील दुर्गंधी दूर करते आणि दात मजबूत करण्यास मदत करते. दात घासण्यासाठी, फ्लोराईड टूथपेस्टने दिवसातून दोनदा सुमारे २ मिनिटे घासणे आवश्यक आहे. ब्रशच्या टोकाला हलक्या, गोलाकार हालचालींनी दातांवर घासून घ्या, दातांच्या पृष्ठभागाला आणि हिरड्यांच्या रेषेला देखील स्पर्श करा, तसेच दातांच्या मागील भागावर आणि आतल्या बाजूला ब्रश करा. योग्य टूथब्रश (मऊ ब्रिस्टल्स असलेला) आणि फ्लोराईड टूथपेस्ट वापरावा. दात घासण्यासाठी सुमारे २ मिनिटे वेळ द्या. ब्रशच्या टोकाला हलक्या, गोलाकार हालचालींनी दातांवर घासून घ्या. दातांच्या पृष्ठभागाला, हिरड्यांच्या रेषेला, दातांच्या मागील भागाला आणि आतल्या भागाला ब्रशने स्पर्श करा.

## पाककला

### शेंगदाणा पोळी

**साहित्य :** १/२ मेजरींग कप शेंगदाणे, १/३ मेजरींग कप गुळ (जास्त गोड आवडत असल्यास १/२ कप), १/२ टिस्पून जायफळ वेलची पूड, २ टेबलस्पून साजूक तूप, १ कप कणीक, मीठ चवीपुरते,

**कृती :** प्रथम कणकेमध्ये मीठ मिक्स करून गरजेनुसार पाणी घालून घट्टसर डो बनवला. थोडे तेल घालून चांगला मळून घ्या व झाकून ठेवा. आता सारण तयार करण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावे व तेल थंड झाल्यावर साल काढून त्याचे कुट करून घ्या. आता कुट व किसलेला गुळ दोन्ही मिक्सरवर फाईन पेस्ट करून घ्या. त्यात साजूक तूप व वेलची जायफळ पावडर दोन्ही मिक्स करावे. गोळा मळून १५ मिनिट झाकून ठेवावा. कणकेच्या लहान गोळ्याची पारी करून त्यात शेंगदाण्याच्या मिश्रणाचा गोळा स्टफ करावा व लाटून पोळी बनवून घेतली. आता फ्राय पॅनवर साजूक तूप घालून शेंगदाण्याची पोळी दोन्ही बाजूने त्यावर शेकून घ्याव्या. या पोळ्या छान खमंग व टेस्टी लागतात.

## वास्तू

### स्टडी रुमसंबंधी

❊ मूल जेव्हा अभ्यासात लक्ष केंद्रीत करत नसेल तर स्टडी टेबलवर ग्लोब किंवा तांबे या धातूचा पिरमिड ठेवा. त्यामुळे नकारात्मक ऊर्जा दूर होऊन मूल अभ्यासात लक्ष केंद्रित करू शकतात.

❊ मुलांच्या स्टडी रूममध्ये टीव्ही, विडीओ प्लेयर किंवा सीडी प्लेयर ठेवता कामा नये. त्यामुळे मुलांचे अभ्यासात लक्ष लागत नाही. जर असेल तर त्याचे कनेक्शन बंद करून ठेवा.

❊ सोमवारी खीरीचा नैवेद्य देवाला अर्पण करा आणि सर्वांना खीर प्रसाद म्हणून द्या. असे केल्यामुळे वास्तुदोष दूर होईल.

## सल्ला

❊ दुधाचे गोड पदार्थ शिजताना जायफळ आणि वेलची घातल्यास दुध फाटते. यासाठी तो पदार्थ थंड झाल्यावर वेलची आणि जायफळ टाकावे.

❊ बटाटे जास्त प्रमाणात उकडले तर ते फ्रिजमध्ये ठेवून नंतर सँडविज, पराठा, पॅटिस, टिक्कीसाठी वापरता येतात.

## सौंदर्य

❊ गुलाबी ओठांसाठी पुदिनांच्या पानांचा रस १५ मिनिटे लावून ठेवावा. नंतर गार पाण्याने धुवावे.

❊ नारळाचे तेल ओठांवर दररोज रात्री लावावे. ओठ चमकदार बनतील.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ५ जून २०२५

**दशहरा समाप्ति, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ शुक्लपक्ष, हस्त अहोरात्र, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** व्यापारात कार्यक्षेत्राचा विकास, व्यापारिक बाधा येऊ शकतात. आय पेक्षा व्यय अधिक असल्याने आर्थिक तंगीची आशंका.

**वृषभ :** यात्रा घडू शकते. अडकलेला पैसा मिळाल्याने आनंद वाटेल. कौटुंबिक चिंता दूर होईल. कर्मक्षेत्रात धावपळ होईल.

**मिथुन :** संपत्ती संबंधी सौद्यात लाभ होण्याची शक्यता. कौटुंबिक जीवनात सुख समृद्धि राहील. सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होईल. दिवस आनंदात जाईल.

**कर्क :** व्यावसायिक स्थिति चांगली राहील. व्यापाराच्या विस्तारासाठी जास्त प्रयत्न करावे लागतील. प्रत्येक गोष्टीत आपलेच खरे करण्याची वेळ येणार आहे.

**सिंह :** अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील. नवे काम, विचार, योजना लांबणीवर पडतील.

**कन्या :** आर्थिक विवादातून नुकसान संभव. कामात मित्रांचा सहयोग मिळेल. आर्थिक लाभ मिळू शकेल.

**तूळ :** कर्जा पासून मुक्ति मिळेल. व्यापारिक लाभ आणि सुख-समृद्धि वाढेल. सामाजिक कामात सक्रिय सहयोग मिळेल.

**वृश्चिक :** आपली मनमेळावू आणि धैर्याची प्रकृतीने समाजात व परिवारात आदर मिळेल. सामाजिक मान-सन्मान वाढेल. कामे मार्गी लागतील.

**धनु :** प्रगतिवर्धक बातम्या मिळतील. मुलांची उन्नति प्रसन्नता देईल. आधी केलेल्या कामाचे फळ मिळेल.


**मकर :** बिघडलेले संबंध सुधारतील. जुनी कामे झाल्यामुळे उत्साह आणि प्रसन्नता वाटेल. महत्वपूर्ण कार्यांवर व्यय होईल.

**कुंभ :** मित्रांच्या सहाय्याने अनुकूलता वाढेल एवं दिवस उत्तम जाईल. उधारी उसनवारी वसुल होईल.

**मीन :** लाभ प्राप्तिचा योग. व्यापारातील आर्थिक त्रासाला संयमाने सोडवण्याचा प्रयत्न कराल.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**


## शब्दगंध क्र. ७१९२ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) पळापळ ४) कमतरता; उणीव; कसर ७) मनसब धारण करणारा ९) हाक १०) अफलातून काम; युक्ती; शक्कल १३) एक धान्य ज्याच्या भाकरी केल्या जातात १५) एक प्रवासी वाहन १६) लढाई; सामना १७) तूर वगैरेच्या डाळीचे शिजवून केलेले एक पातळ कालवण; आमटी १८) ताकद; व्यायामाचा एक प्रकार १९) हुतात्मा; देशासाठी वगैरे बलिदान दिलेला २०) एक लष्करी वाहन २१) डोके; शिर; शेखर

**उभे शब्द :-** १) थोडीशी भीती; शंका २) आरडाओरड; गडबड; दंगा ३) अरण्य; जंगल; रान ४) आदरयुक्त भीती ५) मोठा भाऊ; गुंड ६) भाजीपाला ८) एक छोटा व भित्रा जंगली प्राणी ११) राज्यसंबंधीचे प्रश्न किंवा गुप्त मसलत १२) एक चर्मवाद्य १४) जुलमी; श्रेष्ठ; खंबीर १६) माजलेला; उन्मत्त १७) शंका; संदेह; संशय

### शब्दगंध क्र. ७१९१ चे उत्तर



# ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ मुलांचे विश्व ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

संकलक : अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** नात्यांची शाळा सुरू ठेवायची असेल तर गणित हा विषय कच्चा असणे आवश्यक आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### माणूस म्हातारा का बनतो?

म्हातारपण हे दुसरे बालपण असे म्हटले जाते. मात्र आपण रम्य ते बालपण असे म्हटले तरी म्हातारपणाला रम्य म्हणत नाही. चिरतारुण्य हे माणसाचे अनंत काळचे स्वप्न असले तरी प्रत्येक माणसाला अपमृत्यू आला नाही तर म्हातारपणास सामोरे जावेच लागते. जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती म्हातारपणाकडे वाटचाल करीत असते. वृद्धत्व हे शरीरात घडणाऱ्या जीवशास्त्रीय बदलांमुळे येत राहते. जसजसे वय वाढते तसतशा शारीरिक प्रक्रिया मंदावतात. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे शरीरातल्या प्रथिननिर्मिती प्रक्रियांचा वेग कमी होतो. यामुळे मानवी शरीराच्या हालचाली मंदावतात. शारीरिक हालचाली मंदावल्या की त्या प्रमाणात शरीरांतर्गत हालचालीही मंदावतात. अन्नपचन क्रियांवरही वाढत्या वयाचा परिणाम होतोच. हळूहळू माणसाचे वजनही कमी होते. रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. दृष्टी अधू बनते, कानांनी कमी ऐकू येते. खरं तर हे घडणे याला आपण वृद्धत्व म्हणतो. पण अमूक एका वयातच हे घडेल, असे सांगणे अवघड असते आणि या शरीरक्रिया नक्की कशाने मंदावतात याचेही कारण अजून आपल्याला उमगलेले नाही. पण रक्तवाहिन्या जाड होणे, रक्तपेशींची निर्मिती मंदावणे, हाडे ठिसूळ होणे; मूत्रपिंडाचे आणि यकृताचे कार्य मंदावणे यामुळे शरीरभर पोषक द्रव्ये हवी त्या प्रमाणात पोचत नाहीत आणि विषारी द्रव्यांचे उत्सर्जनही हव्या त्या प्रमाणात होत नाही आणि अखेरीस मृत्यू होतो.

### ध्रुव

बृहस्पती नगराच्या उत्तानचरण राजाचा मुलगा ध्रुव. लहानपणी सावत्र आई सुरुची हिने केलेल्या अपमानामुळे या मनुष्यद्वेषी जगाचा संपर्क नको म्हणून तो मधुबन अरण्यात जाऊन तप करू लागला. त्याचे वाढलेले तपसामर्थ्य पाहून नारदाने इंद्राला सावध केले. सर्व देवांसह इंद्र विष्णू भगवानांकडे गेला व विष्णू-लक्ष्मीसह मधुबनात गेले. तेथे ध्रुवबाळाने त्यांच्याकडे मोक्षपद मागितले. यावर भगवंत म्हणाले, तुला मोक्षपद मी दिलेच आहे, पण घरी जाऊन तू आधी आपल्या वडिलांच्या राज्याचा स्वीकार कर, उत्तम पद्धतीने राज्य कर. नंतर तू इच्छा करशील तेव्हा तुला मोक्षपद प्राप्त होईल.

विष्णूंच्या आज्ञेनुसार ध्रुव परत येताच राजाने शुभमुहूर्त पाहून वायुकन्या विडा व कोंडा यांच्याबरोबर ध्रुवाचे लग्न लावून दिले व आपले राज्य त्याला दिले. सुरुचीलाही एक पुत्र असून, त्याचे नाव उत्तम होते. एके दिवशी उत्तम सैन्य घेऊन शिकारीसाठी अरण्यात गेला होता. ते अरण्य यक्षपतीचे होते. दोघांचे युद्ध होऊन उत्तम त्यात मारला गेला. पुत्रशोकामुळे सुरुची वेडीपिशी झाली. यक्षाची खोड मोडतो, असे म्हणून ध्रुव सैन्य घेऊन यक्षावर चालून गेला. दोन्ही सैन्यांत तुंबळ युद्ध झाले. ध्रुवाचे युद्धकौशल्य पाहून यक्षाने मायावी युद्ध सुरु केले. ध्रुवाच्या सैन्यात त्याने साप, विंचू सोडले. ध्रुवाचे सैन्य भयभीत होऊन पळू लागले.

वसिष्ठ गुरुंच्या सांगण्यावरुन त्याने श्रीविष्णूचे स्मरण केले. विष्णूंनी प्रकट होऊन ध्रुवाला आत्याविषयक उपदेश केला. त्यामुळे ध्रुवाच्या मनातील यक्षाविषयीचा वैरभाव मिटला. त्याने युद्ध बंद केले, तसेच सुरुचीची समजूत घातली. विष्णूच्या आज्ञेप्रमाणे ध्रुवाने आपला मुलगा उत्कल याला राजा बनवले व तो अढळपदाकडे निघून गेला.

## जीवन का अमृत (भाग १)



मुझे यह जानकर दुःख हुआ कि आपकी प्रिय माँ और पति के बीच गलतफहमी की वजह से आपके परिवार पर मुसीबत आन पड़ी है। ऐसी बातें कभी-कभी हो जाया करती हैं, ताकि रूहानियत के जिज्ञासु की परीक्षा हो सके। मुझे खुशी है कि भड़काने के बावजूद भी आप शांत रहीं और इससे आपका तनाव कम होगा। ऐसे मौकों पर सुनहरा सिद्धांत यह है कि आप उस जगह से हट जाएँ और वातावरण को शांत होने दें, ताकि घटित

बातों का जायजा लिया जा सके। एक गिलास ठंडे पानी का सेवन अक्सर हमें शांत करने में मदद करता है, इसे ले लेना चाहिए और एकदम चुप्पी साध लेनी चाहिए। यह एक आजमाई हुई दवा है और आप इसे अपनी माँ और पति, दोनों को बता सकती हैं।

२२. किसी भी नामलेवा को अपने अतीत या भविष्य के बारे में चिंता नहीं करनी चाहिए। वर्तमान उनके हाथों में है और उसका भरपूर फायदा उठाना

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

चाहिए। वे नेक विचार रखें, तथा नेक बर्ताव और नेक कार्य करें। जितना ज्यादा वे संत-सत्गुरुओं का कहा मानेंगे, उतना ही अधिक दिव्य खजाना उनको मिलेगा।

जिस झगड़े के बारे में आपने लिखा है, उसका समाधान केवल प्रेम ही है। प्यार रूहानियत का आदि भी है और अंत भी। प्यार निष्काम सेवा, बलिदान और आत्म समर्पण माँगता है। ध्यान रखो कि जो कोई भी आध्यात्मिक उन्नति चाहता है, वह ऐसी निष्काम सेवा अपनी मान बडाई के लिए ना करे। निष्काम सेवा तो अपने आप में एक उपहार है। प्यार, जिसकी बात सत्गुरु करते हैं, ऐसा प्यार है, जिसमें लेशमात्र भी अहम् नहीं होता। सत्गुरु मिल जाने के बाद जो जिज्ञासु उसके प्रति ऐसा संपूर्ण प्रेम विकसित कर लेता है, वह हर प्रकार की कमियों से लगातार रहित होता जाता है और अपने आप को दिव्य दया के योग्य बना लेता है। जब तक अहंकार और 'मैं' का हर छोटे से छोटा अंश हम में से निकल नहीं जाता, हमारी इंद्रियों की पूर्ण एकाग्रता नहीं बनती है, जो कि हमारी आंतरिक उन्नति के लिए जरूरी है।

इसके अलावा, आध्यात्मिक जिज्ञासु का लक्ष्य व्यक्तिगत सीमाओं से बहुत दूर होता है । उसका लक्ष्य है पूर्ण प्रभु से मिलाप और ऐसा मिलाप उन सभी सीमाओं को अस्वीकार कर देता है, जो हमें एक दूसरे से अलग करती हैं। जो अहंकार से ऊपर नहीं आ सकता, वो अहंकार, जो ये सारी सीमाएँ बनाता है, वह उस अवस्था को पाने की उम्मीद नहीं कर सकता, जिसमें हर प्रकार का अलगाव खत्म हो जाता है और सभी जीवों के एक होने का ज्ञान हो जाता है। सत्गुरु में कार्यरत प्रभु की इच्छा के प्रति ऐसा प्रेम और आत्म समर्पण, सभी अध्यातमविदों, खासकर संतमत की शिक्षाओं का सार रहा है। शिष्य और नामलेवा के रूप में आपका मुख्य कर्तव्य है, इन गुणों को पूर्ण रूप से धारण करना। बाकी सब आप सत्गुरु पर छोड़ दें।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

कोयल की आवाज का इस चक्र पर प्रभाव होता है। इस लिए कोयल की आवाज सुना करें। वह गीत सुने जिस में कोयल की आवाज हो। शिव बाबा या इष्ट को याद करते हुए विश्व की सभी कोयलों को तरंगे दिया करें। मन में कोयल की आवाज रिपीट किया करें।

साधना या राजयोग का अभ्यास करते समय कंठ पर बिंदू देखें और कहें भगवान आप प्यार के सागर हैं, प्यार के सागर हैं। इस से यह चक्र जागृत होता है।

जो गीत बहुत अच्छे लगते हैं वह सुना करें। इस से भी कंठ चक्र जागृत होता है।

### आज्ञा चक्र

आज्ञा चक्र छठा मूल चक्र है जो मस्तिष्क के मध्य, भौहों के बीच में स्थित है। इसे तीसरा नेत्र भी कहते हैं। रीढ़ की हड्डी के एक दम ऊपर मेरुदंड

### विशुद्ध ऊर्जा चक्र

और मस्तिष्क के संधि स्थल के नजदीक है। आज्ञा का अर्थ 'आदेश' होता है। आदेश हमेशा स्वामी अथवा नियंता की ओर से जाता है। इस दृष्टि से ये सम्पूर्ण चक्र संस्थान का नियंत्रण करता है। सभी उर्जा चक्रों को आदेश और निर्देश यहीं से जाता है। आज्ञा चक्र का कार्य क्षेत्र वहां है जहां लोग तिलक, चंदन या कुम कुम लगाते हैं। आज्ञा चक्र ही आत्मा है। जिसे रूह भी कहते हैं। तीसरा नेत्र, शिव नेत्र वा दसवां द्वार और जागती ज्योति भी कहते हैं।

यहीं से आत्मा सोचती, बोलती और कार्य करती है इस चक्र को श्री कृष्ण चक्र और गुरु चक्र भी कहते हैं। इस चक्र का मूल गुण शांत स्वरूप, प्रेम स्वरूप, सुख स्वरूप, आनंद स्वरूप और ज्ञान स्वरूप है। यही कारण है राजा, रंक, विकारी, पतित, चोर, ठग, छोटा, बड़ा, बूढ़ा और जवान सभी मुख्य दो चीजें चाहते हैं, नम्बर एक शांति और नम्बर दो प्रेम ।

आज व्यक्ति के पास चाहे कितनी ही भौतिक वस्तुयें हो, सुख सुविधायें हो फिर भी एक अनजाना सा खालीपन जीवन में बना रहता है, अतृप्ती सी बनी रहती है, एक तलाश सी लगी रहती है क्योंकि व्यक्ति के जीवन में शांति और प्रेम नहीं है। ये दोनो शक्तियां हमें सफेद है। यहां भगवान को याद करने से मिलती हैं। इस चक्र का दो पंखुड़ियों वाला कमल है। इन दो पंखड़ियों वाले स्थान पर दो नाड़ियां मिलती हैं। उन से प्रकाश निकलता रहता है जो कमल की तरह दिखता है। पांच विकार काम, क्रोध, लोभ, मोह अहंकार इस चक्र में रहते हैं। पांच सूक्ष्म विकार ईर्ष्या, आलस्य, अलबेलापन,

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

''भारतात कुणाचीही युती होऊ शकते, पण,
पाऊस आणि महावितरणची युती कधीच होऊ शकत नाही
वाटीभर पाऊस पडला की रात्रभर लाईट गेलीच समजा''

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ २०२४ चा साहित्याचा जेसीबी पुरस्कार यांनी मिळविला?

– उपमन्यू चटर्जी

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

विशेषत: ताप, डोकेदुखी, तृष्णा, चक्कर येणे, उलटी, सरदी, खोकला, दमा, जुलाब यांसारखे आजार या काळात उद्भवतात. या काळातील व्याधी व त्याने बालकाला होणारा त्रास वर्णन करताना वाग्भटाचार्य म्हणतात, की तांबी काढल्यानंतर रक्तस्त्राव थांबतो. संतती प्रतिबंधासाठी Medroxy Progesteron cetate या हार्मोन्सपासून बनवलेले इंजेक्शन वापरले तर काही स्त्रियांना अति रक्तस्राव होतो. या इंजेक्शनमुळे बीजनिर्मिती होत नाही. त्यामुळे अनियमित, काही दिवसांच्या अंतराने अति रक्तस्राव होतो. इंजेक्शन बंद केल्यानंतर रक्तस्राव नियमित सुरू होतो.

**ड) अंत:स्रावी ग्रंथींचे विकार :** पिट्युटरी ग्रंथी, थायरॉईड ग्रंथी यांच्या अंत:स्रावांमध्ये असंतुलन झाल्यास बऱ्याच वेळेला अति रक्तस्राव होतो. रक्त तपासणीमधून निदान करून योग्य उपचार केल्यास रक्तस्राव कमी होतो.

**लॅपरोस्कोपी :** तपासण्यांवरून निदान होत नसेल, तर पोटावर छोटासा छेद घेऊन लॅपरोस्कोपी करतात. यामध्ये उदर पोकळीत

### बालकांचे आजार

दुर्बीण टाकून गर्भाशय, गर्भनलिका, बीजकोष या अवयवांना प्रत्यक्ष बघून निदान करणे सोपे जाते.

**हिस्टेरोस्कोपी :** यात योनिमार्गातून गर्भाशयमुखाच्या आत दुर्बीण टाकली जाते. गर्भाशयाच्या आतील सर्व परिस्थिती या तपासणीतून समजते. विशेषत: गर्भाशयाच्या आतील अस्तराची स्थिती समजते.

कृमीकुठाररस ही गोळी दोन वेळा बालकास द्यावी. या गोळीतील सर्व औषधी ही कृमीघ्न असल्यामुळे शरीरातील गोल कृमी, चपटे कृमी, धान्याच्या अंकुरासारखे असणारे कृमी नष्ट होतात. पाच दिवस ही गोळी सकाळ-संध्याकाळ दोन वेळा द्यावी व त्यानंतर पाचव्या दिवशी रात्री एरंडेल तेल ५ मि.लि. बालकास द्यावे. यामुळे गोल, चपटे, सर्व कृमी शौचाद्वारे बाहेर पडतात. या औषधाच्या सेवनाने उलटी-मळमळ झाल्यास दही-भात खाण्यास द्यावा किंवा लिंबूरस पिण्यास द्यावा. याने वरील लक्षणे कमी होतात. आयुर्वेदातील श्रेष्ठ ऋषी वाग्भटाचार्यांनी दंतोद्भव या काळात सर्व रोगाचे आयतन म्हणजेच सर्व रोगाचे माहेरघर असे वर्णन केलेले आहे. विशेषतः ताप, डोकेदुखी, तृष्णा, चक्कर येणे, उलटी, सरदी, खोकला, दमा, जुलाब यांसारखे आजार या काळात उद्भवतात. या काळातील व्याधी व त्याने बालकाला होणारा त्रास वर्णन करताना वाग्भटाचार्य म्हणतात, की बालकाला दात येण्याच्या वेळी असा अर्थात त्या काळात बालकाचे सर्व मांजरीची पाठ मोडल्यावर, तसेच मोराला तुरा येताना व बालकाला दात येण्या कोणता शरीरातील दोष धातू नाही की जो दषित होत नाही. अर्थात त्या काळात शरीर वेदनादायक व आजारांनी ग्रासलेले असते. कारणे- दात बाहेर येताना बालकांना हिरड्यांमध्ये सळसळ जाणवत असत. तोंडामध्ये कोणतीही दूषित वस्तू टाकते व ती चावते याने बालकाला जंतुसंसर्ग होता व त्यातूनच सरदी, खोकला, ताप, उलटी, मळमळ अशा स्वरूपाचे आजार होतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००





माहेश्वरी युवा संगठनच्यावतीने महेश नवमीनिमित्त नगर शहरातून शोभा यात्रा काढण्यात आली होती. समाजातील स्त्री-पुरुष सहभागी झाले होते.

# माहेश्वरी युवा संगठनच्यावतीने महेश नवमीनिमित्त शहरातून शोभायात्रा

नगर – माहेश्वरी युवा संगठनच्यावतीने महेश नवमीनिमित्त नगर शहरातून शोभा यात्रा काढण्यात आली होती. या शोभायात्रेत महेश मंगल कार्यालय येथून प्रारंभ करण्यात आला. ही शोभायात्रा रामचंद्र खुंट, तपकिर गल्ली, सराफ बाजार, भिंगारवाला चौक, कापड बाजार, तेलीखुंट, आडते बाजार मार्गे पुन्हा महेश मंगल कार्यालय येथे आल्यानंतर त्या ठिकाणी भगवान शंकरची आरती करण्यात आली. घोडागाडी, बॅण्ड पथकाने सर्वांचे लक्ष वेधले. या शोभायात्रेचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले.

माहेश्वरी समाजाचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे 'महेश नवमी' होय. या उत्सवानिमित्त समाजातील सर्व घटकांना एकत्रित करुन समाजोन्नत्तीचे उपक्रम राबविले जात आहे. सण-उत्सवातून आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न केला जात आहे. समाज संगठन करुन समाजातील प्रत्येक घटकांच्या अडचणी, प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे. आज महेश नवमीनिमित्त शहरातून भव्य मिरवणुक काढण्यात आली, यात समाज बांधव सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे विविध स्पर्धांच्या माध्यमातून प्रत्येकाच्या कला-गुणांना वाव देण्याचा प्रयत्न केला आहे. वर्षभर विविध उपक्रमातून समाजातील प्रत्येक घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येते. महेश नवमीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बुद्धीबळ स्पर्धा, बॅडमिंटन स्पर्धा, गायन-वादन, पौराणिक प्रश्नमंजुषा आदि स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंडळाचे सदस्य अध्यक्ष-शाम भुतडा, सचिव-संकेत मानधने, विशाल झंवर, अमित खटोड, अभिनंदन कालाणि, अनिकेत बलदवा, भूषण काबरा, प्रणव बिहानी, गोविंद दरक, गोविंदा जाखोटिया, गोविंदा काकांनी, कुणाल लोया, मधुर बिहानी, मुकुंद जाखोटिया, पवन बंग, पवन बिहानी, पियुष झंवर, प्रतीक सारडा, ऋषीकेष बजाज, संग्राम सारडा, संकेत अट्टल, शेखर असावा, योगेश सोमानी, सुमित बिहानी, सुमित चांडक, वेदांत बजाज, प्रकल्प प्रमुख-प्रतीक सारडा, मनीष नावंदर, सोमाणी मनिष यांच्यासह माहेश्वरी युवा संघटनेचे पदाधिकारी, सदस्य व सर्व माहेश्वरी समाज बंधू-भगिनी यांनी परिश्रम घेत सर्व कार्यक्रम यशस्वी केले.

# महाराष्ट्र शिक्षा भूषण पुरस्काराने नगरचे प्रा.विजय शिंदे सन्मानित



महाराष्ट्र शिक्षा भूषण पुरस्काराने नगर येथील प्रा. विजय शिंदे सन्मानित करण्यात आले.

नगर – आयडीवायएम फाउंडेशन व इसरो यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई येथे पार पडलेल्या महाराष्ट्र शिक्षा भूषण २०२५ या सोहळ्यात नगर येथील प्रा. विजय शिंदे यांना यंदाचा महाराष्ट्र शिक्षा भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. चेतना पब्लिकेशनचे विभागीय संचालक राज शर्मा यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी अजय चौबे, स्नेहालय शाळेच्या मुख्याध्यापिका वीणा मुंगी, विवेकानंद स्कुल च्या कांचन पापडेजा उपस्थित होत्या.

या पुरस्कारासाठी शिंदे यांनी डॉ. शरद कोलते इंग्लिश मिडीयम स्कुल पारगावच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मुलांसाठी केलेली शिक्षणाची. याचबरोबर परिसरातील शेतकरी, महिला, युवक यांच्यासाठी केलेल्या आरोग्य शिबीर, उद्योजकता मार्गदर्शन, वृक्षारोपण अशा देखील कामाची दखल घेतली आहे.

लवकरच शाळेत सौ. वैशाली कोलते कौशल्य विकास केंद्राची स्थापना करण्यात येणार असून त्या माध्यमातून रोजगाराची संधी निर्माण करण्यात येणार आहे. डॉ. नितीन कोलते यांनी शाळेला चिंचा फोडणी मशीन उपलब्ध करून डोनेट केले आहे त्या माध्यमातून येणारे उत्पन्न शाळेच्या विकासासाठी वापरण्यात येणार आहे. हे सर्व उपक्रम शिंदे यांना पुरस्कार मिळवण्यासाठी विचारात घेण्यात आले आहेत. शिंदे नगर मधील आयएमएस या व्यवस्थापन संस्थेत सहाय्यक प्राध्यापक या पदावर काम करत असून तेथे देखील अशाच प्रकारे अनेक सामाजिक व शैक्षणिक उपक्रमात सहभागी असतात.

या पुरस्काराबद्दल संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, विभागप्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे, माजी सरसंचालक डॉ. शरद कोलते, निवृत्त महसूल अधिकारी शिवाजी टेमकर, वसंत दिवटे, उद्योजक शहाजी मोरे, सर्व कुटुंबीय व परिसरातील नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

# जागतिक पर्यावरण दिवसानिमित्त नगरमध्ये ५ जूनला सामुदायिक अग्निहोत्राचे आयोजन



नगर – जागतिक पर्यावरण दिवसानिमित्त समस्त अहिल्यानगर अग्निहोत्र आचरणकर्ता, माधवाश्रम बैरागड, भोपाळ (मध्य प्रदेश) यांच्यातर्फे ५ जून रोजी सावेडीतील क्रीडामहर्षी महादेव तथा दिनुभाऊ कुलकर्णी क्रीडांगण अर्थात जॉगिंग ट्रॅक येथे सायंकाळी ६ वा. सामुदायिक अग्निहोत्राचे आयोजन केले आहे.

मानवाने स्वार्थापोटी प्रदूषणरुपी राक्षसाला जन्माला घातले व त्यातून पृथ्वीवरचे पर्यावरण विषाक्त केले आहे. त्यातून प्रकृतीची प्राण ऊर्जा कमी होता होता आता संपल्यातच जमा झाली आहे. स्वतः उत्पन्न केलेल्या या प्रदूषणरूपी कचऱ्याला साफ करून पर्यावरण पुन्हा जगण्यालायक करावे यासाठी मानव जातीसाठी ही शेवटची संधी आहे.

आपण मनुष्य आहोत म्हणून वेदोक्त प्राण-ऊर्जा सिद्धांतावर आधारित अग्निहोत्राचे आचरण करावे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. देश, जाती, समाज आणि धर्म-संप्रदायाच्या प्रती जे कर्तव्य असेल ते त्यानंतर आहे. देश, जाती, समाज आणि धर्म-संप्रदायाचे असणे हेच मानवाच्या असण्यावरच अवलंबून आहे व मानवाचे अस्तित्वच शुद्ध आणि स्वच्छ पर्यावरणावर अवलंबून आहे. पर्यावरणाचे रक्षण व प्रदूषण नियंत्रण केवळ अग्निहोत्रच करू शकते म्हणून अग्निहोत्राचे आचरण आजपासूनच सुरू करावे.

अहिल्यानगरकर अग्निहोत्र नियमित साधकांनी केवळ अग्निहोत्र पात्र घेऊन यावे व नव्याने अग्निहोत्र प्रारंभ करू इच्छिणाऱ्या सर्व वयोगटातील स्त्री- पुरुषांना तेथे अग्निहोत्र पात्र व इतर साहित्य दिले जाईल. पर्यावरण रक्षण व प्रदूषण नियंत्रणाच्या या अभियानात आपण सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात येत आहे.

# कचरावेचकांना आरोग्यासाठी मार्गदर्शन : महापालिकेचा उपक्रम

## विविध कल्याणकारी योजनांची माहिती, रामवाडी परिसरातील कचरावेचकांचा उत्स्फूर्त सहभाग



अहिल्यानगर महापालिकेच्या वतीने शहरातील कचरावेचकांसाठी आयोजिलेल्या विशेष प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेले कचरा वेचक.

नगर – शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सतत झटणाऱ्या कचरावेचकांचे आरोग्य व सुरक्षितता अबाधित रहावे, यासाठी अहिल्यानगर महापालिकेच्या वतीने शहरातील कचरावेचकांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराला कचरावेचकांचा प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमात कचरावेचकांना निरोगी आरोग्य राखण्यासाठी आवश्यक खबरदारी, विविध आजारांपासून बचावाचे उपाय, उपचारासाठी असलेल्या योजना तसेच केंद्र शासनाच्या नमस्ते योजना व अन्य कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली.

शिबिरात अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था संघटक रमजान अली रंगरेज यांनी प्रत्यक्ष कचरा गोळा करताना घ्यावयाची काळजी, हातमोजे, मास्क, सॅनिटायझर वापराचे महत्त्व याबाबत प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. उतारवयात होणाऱ्या आजारांपासून बचाव, शारीरिक तंदुरुस्ती राखण्याचे उपाय यावरही विशेष मार्गदर्शन केले.

केंद्र शासनाच्या नमस्ते योजनेच्या माध्यमातून कचरावेचकांची नोंदणी सुरू आहे. या योजनेतून त्यांना रोजगार, विमा, आरोग्य तपासण्या, औषधोपचार व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळणार असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी महापालिकेच्या घनकचरा विभागाचे लांडगे व कष्टकरी पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास उडानशिवे, विकास धाडगे, मनोहर चखाले, विकास वाल्हेकर, सागर खुडे, रोहन साबळे, काळू खुडे आदींसह कचरा वेचक उपस्थित होते.

शिबिराच्या आयोजनात महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त संतोष टेंगले, सहाय्यक आयुक्त सपनाबेन वासवा, घनकचरा व्यवस्थापन प्रमुख अशोक साबळे, तसेच माजी नगरसेवक व कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतचे अध्यक्ष भाऊसाहेब उडानशिवे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

कचरावेचक हे शहराच्या स्वच्छतेचे खरे शिल्पकार आहेत. त्यांचे आरोग्य हे समाजाच्या आरोग्याशी जोडलेले आहे. अनेकदा हे काम धोकादायक ठरू शकते, त्यामुळे त्यांना योग्य मार्गदर्शन, सुरक्षित साधनसामग्री व आरोग्य सुविधा मिळणे गरजेचे आहे. महापालिकेच्या सहकार्याने आम्ही अधिकाधिक कचरावेचकांपर्यंत या योजनांचा लाभ पोहोचवण्याचा संकल्प आहे, असे विकास उडानशिवे यांनी सांगितले.

# ज्ञानमंदिर उभारणीसाठी समर्थ प्रशालेच्या बांधकामासाठी विद्यार्थिनीची आर्थिक मदत



ज्ञानमंदिर उभारणीसाठी कन्येच्या हस्ते मंडळाच्या सहकारनगर, सावेडी येथील नवीन समर्थ प्रशालेच्या बांधकामासाठी आर्थिक मदतीचा धनादेश संस्थेस दिला.

नगर – श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, सावेडी (माध्यमिक विभाग) येथील इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या कु. अनुश्री दिगंबर गवळी हिचा वाढदिवस यावर्षी एका वेगळ्या व प्रेरणादायी पद्धतीने साजरा करण्यात आला. इतर कुठलाही खर्च न करता, अनुश्रीच्या वडिल दिगंबर गवळी यांनी आपल्या कन्येच्या हस्ते मंडळाच्या सहकारनगर, सावेडी येथील नवीन समर्थ प्रशालेच्या बांधकामासाठी आर्थिक मदतीचा धनादेश संस्थेस दिला.

अनुश्रीचा वाढदिवस एक वेगळा दृष्टिकोन घेऊन पुढे आला. फुगे, केक, गिफ्ट्स नकोत, तर शिक्षणाचा भक्कम पाया रचणाऱ्या शाळेच्या उभारणीत स्वतःचा सहभाग हवा, अशी प्रेरणा देणारा हा सकारात्मक उपक्रम ठरला. गवळी हे एमआयडीसीतील एसीई फिडस् येथे व्यवस्थापक (मॅनेजर) पदावर कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, अनुश्रीच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आपण अशा शाळेच्या उभारणीत सहभाग घेतला आहे, जिथून शेकडो विद्यार्थी भविष्यात समाजसेवेसाठी सिद्ध होतील. ही गोष्ट अनुश्रीला मोठेपणी अभिमान वाटावा अशा पिढी घडवणाऱ्या शाळेसाठी साजरा करण्यात आल्याचे, ते म्हणाले.

या स्तुत्य कार्याबद्दल गवळी यांचा किशोर देशपांडे (नवीन समर्थ प्रशालेचे बांधकाम प्रमुख, कार्यकारिणी सदस्य व शालेय समिती अध्यक्ष), व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव सुरेश क्षीरसागर व प्राचार्या श्रीमती जोशी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पर्यवेक्षक सुनील कानडे, शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकवर्ग उपस्थित होते. सर्वांनी अनुश्रीचे व तिच्या कुटुंबाचे अभिनंदन करत ही कृती ज्ञान मंदिर उभारणीला सर्वांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत व्यक्त केले.

# संत निरंकारी मिशनच्यावतीने ५ जूनला 'व्यापक वृक्षारोपण व स्वच्छता अभियान'

## देशभरातील १८ प्रमुख पर्वतीय व पर्यटन स्थळांचा समावेश




नगर – संयुक्त राष्ट्र संघाकडून दरवर्षी ५ जून रोजी 'विश्व पर्यावरण दिवस' आयोजित केला जातो. या वैश्विक पुढाकारातून प्रेरणा घेत सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांच्या लोकमंगलकारी व दूरदर्शी नेतृत्वाखाली संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन संयुक्त राष्ट्राकडून निर्धारित थीम 'बीट प्लास्टिक सोल्युशन' ला केंद्रीभुतठेवत देशभरातील १८ प्रमुख पर्वतीय पर्यटन स्थळावर ५ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत एक व्यापक वृक्षारोपण व स्वच्छता अभियान आयोजित करीत आहे. यामध्ये महाराष्ट्रातील महाबळेश्वर, पाचगणी, खंडाळा, लोणावळा, पन्हाळा व सोमेश्वर या ठिकाणी निरंकारी मिशनचे स्वयंसेवक, सेवादल सदस्य, भक्तगण व स्थानिक नागरिक मंगलकारी प्रार्थनेत सहभागी होऊन कार्यक्रमाची सुरुवात करतील.

याप्रसंगी युवा स्वयंसेवक प्लास्टिक प्रदूषणाचा दुष्परिणाम आणि त्यावरील उपाय योजना यावर जनजागृती करतील तसेच पर्यावरण संरक्षणाचे संदेश देणारे फलक व बॅनर हातात घेऊन मानवी साखळी तयार करून यावेळी समाजाला प्रेरणा दिली जाणार आहे.

या विश्व पर्यावरण दिवस प्रसंगी संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचा हा एक समर्पित पर्याय एक सार्थक संदेश देत आहेत की सर्वांनी मिळून पर्यावरणाचे रक्षण करूया ज्या योगी भावी पिढ्यांसाठी एक स्वच्छ सुंदर आणि संतुलित पृथ्वी सजवली जाऊ शकेल.

# दातांची निगा राखताना योग्य ती काळजी घ्यावी

## डॉ. प्रियंका कुलकर्णी यांचे आवाहन; नॅचरल दात वाचविणे गरजेचे



रुग्णांची तपासणी करताना रुट कॅनल स्पेशालिस्ट, इम्प्लांट व स्माईल डिझायनिंग तज्ज्ञ डॉ. प्रियंका कुलकर्णी (छाया – समीर मन्यार)

नगर – दातांची निगा राखताना योग्य ती काळजी घेणे गरजेचे आहे. गोड पदार्थ खाऊन झोपू नये. सकाळी उठल्यावर व रात्री झोपताना ब्रश करावा. दात स्वच्छ केल्याने आपल्या शरीरावर व दातांवर कुठलाही परिणाम/इजा होत नाही. मावा, गुटखा, स्मोकिंग करू नये. त्यामुळे मोठा आजार उद्भवण्याचा धोका संभवतो. किमान तीन महिन्यातून दातांची तपासणी दंत तज्ज्ञांकडून करून घ्यावी. वर्षातून दोनदा दात स्वच्छ करून घ्यावेत. दात किडण्यास सुरुवात होताच डॉक्टरांनी दाखवावे, त्याकडे दुर्लक्ष करू नये. दाढ काढल्यास त्याचा आपल्या शरीरावर कुठलाही परिणाम होत नाही. सर्व दातांना झिणझिण्या येत असतील, तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. घरगुती उपचार टाळावेत. नॅचरल दात वाचविणे गरजेचे आहे. रुट कॅनल केल्यानंतर दात दुखतात असा रुग्णांचा गैरसमज असून, पेनलेस रुट कॅनल होते, अशी माहिती रुट कॅनल स्पेशालिस्ट, इम्प्लांट व स्माईल डिझायनिंग तज्ज्ञ डॉ. प्रियंका कुलकर्णी यांनी दिली.

रुट कॅनल स्पेशालिस्ट, इम्प्लांट व स्माईल डिझायनिंग तज्ज्ञ डॉ. प्रियंका पुष्कराज कुलकर्णी या बालिकाश्रम रोडवरील महालक्ष्मी उद्यानजवळ पिनॅकल क्लिनिक व डेंटल केअरच्या माध्यमातून मागील ६ वर्षांपासून रुग्णसेवा करीत आहेत. या क्लिनिकमध्ये दातांवरील सर्व प्रकारचे उपचार केले जातात. अद्ययावत उपकरणांद्वारे उपचार केले जात असल्याने यामध्ये अचूकता आहे. डेंटल केअरद्वारे नसेच्या इलाजाद्वारे किडलेला दात वाचविणे, मशिनद्वारे दात स्वच्छ करणे, चांदी/दातांच्या कलरचे सिमेंट भरणे, दातांची संपूर्ण/ अंशिक कवळी बसविणे, वेडेवाकडे दात सरळ करणे, कृत्रिम दंतरापोण (इम्प्लांट), डेंटल एक्स-रे युनिट, डेंटल ब्लिचिंग, रूट कॅनल, इम्प्लांट व स्माईल डिझायनिंग आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. दातांची योग्य काळजी घेण्यासाठी व आपले नॅचरल दात वाचवण्यासाठी वेळीच योग्य उपचार करावे असे ते यावेळी म्हणाल्या योग्य सल्लूयासाठी ९३४०७६२६५८२ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले.



१ मे महाराष्ट्र दिनला यवतमाळ जिल्ह्यातून निघालेल्या महाराष्ट्र सायकल यात्रेने नगरमध्ये प्रवेश केला.

# महाराष्ट्र सायकल यात्रेचा अहमदनगर जिल्ह्यामध्ये प्रवेश

नगर – ग्राम संस्कृती ही आपल्या देशाची ओळख आहे. म्हणून संपूर्ण ग्रामीण क्षेत्राचा लोकशाही मूल्यनिष्ठ पद्धतीने समतोल व सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. करिता ग्रामीण क्षेत्र पंचायत राज शासन व्यवस्थेमध्ये सुधारणा व्हाव्या. या उद्देशाकरिता महाराष्ट्र सायकल यात्रा सुरू आहे.

१ मे महाराष्ट्र दिनला यवतमाळ जिल्ह्यातून निघालेली ही सायकल यात्रा वाशिम हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सातारा व पुणे जिल्ह्यातून ही सायकल यात्रा अहिल्यानगर जिल्ह्यात आलेली आहे. प्रथम राळेगणसिद्धी येथे अण्णा हजारे यांना भेटून नंतर आदर्शगाव हिवरेबाजार येथे जाणार आहे. पोपटराव पवार यांचे मार्गदर्शन स्नेहालय येथे यात्रा जाईल. अहिल्यानगर शहरामध्ये जिल्हाधिकारी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांना निवेदन देणार आहे.

यात्रेविषयी सर्वांना माहिती व्हावी, याकरिता एका सामूहिक सभेचे आयोजन ६ जून रोजी सायंकाळी ६ वाजता स्नेहालय पुनर्वसन संकुल रवींद्रनाथ टागोर हॉल, MIDC, अहिल्यानगर येथे केलेले आहे. या कार्यक्रमासाठी सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन स्नेहालयचे प्रमुख डॉ. गिरीश कुलकर्णी, भरत बगरेचा, हनीफ शेख, विकास सुतार, अहिल्यानगर सायकलिस्ट असोसिएशनचे चंद्रशेखर मुळे यांनी केले.

# नगर येथील आजी व अंध धावपटूंची मॅरेथॉनमधील अनोखी कामगिरी



नववारी साडी नेसलेल्या आजी व त्याच्या मदतीने अंध धावपटूने दहा किलोमीटर अंतराची शर्यत पूर्ण करण्याची किमया हिस्टोरिक रन या मॅरेथॉन स्पर्धेच्या वेळी घडली.

नगर – नववारी साडी नेसलेल्या आजी व त्याच्या मदतीने अंध धावपटूने दहा किलोमीटर अंतराची शर्यत पूर्ण करण्याची किमया हिस्टोरिक रन या मॅरेथॉन स्पर्धेच्या वेळी घडली. ६५ वर्षाच्या आजीचे नाव आहे कमलताई बनकर व अंध धावपटूंचे नाव आहे अजय धोपावकर. त्यांनी १ तास ४३ मिनिटात सलगपणे धावत सर्वांनाच आश्चर्यचकित केले. त्याच्या या प्रेरणादायी व आदर्श कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

भुईकोट किल्ला परिसरात १ जूनला झालेल्या मॅरेथॉन स्पर्धेच्या वेळी आजींनी साडीवर मॅरेथॉनसाठी लागणारा टी-शर्ट व क्रमांक परिधान केला होता व त्याच्या डोक्यावरही पदर होता. अशाप्रकारे त्यांनी मराठी परंपराही जोपासली. आजींनी पुढे पळताना धोपावकर यांच्या हातातील दोरीचे पुढचे टोक पकडले होते मागील टोक धोपावकरांच्या हातात होते. धावतांना आजी रस्त्यातील खड्डे, गतिरोधक, चढ-उतार याची माहितीही धोपावकर यांना देत होत्या. अन्य पळणारे धावपटूही त्यांना मदत करत होते. आजी बनकर यांनी आतापर्यंत वेगवेगळ्या अंतराच्या १२ मॅरेथॉन पूर्ण केल्या आहेत. अशी कामगिरी करणाऱ्या नगर जिल्ह्यातील एकमेव मॅरेथॉन पटू आहेत. आजींचे कुटूंबही वेगवेगळ्या मॅरॅथॉनमध्ये सहभागी होत असते. त्यांचा मुलगा सुनील, सून सविता, नातू अभय व अमृत बनकर हे ही हिस्टोरिक रनमध्ये १० किलोमीटर धावले. आजीचा मुलगा सुनील बनकर व रितेश खंडेलवाल हे दोघे दक्षिण आफ्रिकेत ८ जूनला होणाऱ्या कॉम्रेड मॅरेथॉनला जात आहेत. ही मॅरेथॉन ८९ किलोमीटरची असून त्यांना ती १२ तासात पूर्ण करायची आहे. श्री. धोपावकर यांनी आतापर्यत १७ मॅरेथॉन पूर्ण केल्या आहेत. अशी कामगिरी करणारे देशातील दुसरे व नगर जिल्ह्यातील एकमेव अंध धावपटू आहेत.

# विद्यार्थ्यांना ३० लाखांपर्यंत कर्ज, महिलांना गृहउद्योगासाठी सहाय्य, तर लघुउद्योजकांना व्यवसायवाढीसाठी आर्थिक मदत : वसंत लोढा

### जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अधिकारी व ऑल इंडिया जैन कॉन्फरन्सचे पदाधिकाऱ्यांची विविध विषयाबाबत बैठक

नगर – जैन समाजातील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावा तसेच गृह उद्योग व बचत गटांना प्रोत्साहन मिळावे, याचबरोबर व्यापाऱ्यांना व्यवसायासाठी मदत व्हावी यासाठी शासनाने जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली, असून त्याचे कार्यालय नगर येथे सुरू झाले आहे. जैन बांधवांना याबाबतच्या सर्व कामकाजाची माहिती हवी यासाठी अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी ३० लाखापर्यंत शैक्षणिक कर्ज कमी व्याजदरात मिळत असून शैक्षणिक, आर्थिक आणि व्यवसायिक प्रगतीस चालना मिळेल. शिक्षण, स्वयंरोजगार आणि उद्योजकता यांना चालना, या बैठकीचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे जैन समाजातील सर्वसामान्य कुटुंबापर्यंत शासकीय योजनांची अचूक व सविस्तर माहिती पोहोचवणे. अनेक वेळा समाजात उपलब्ध योजना माहितीअभावी अंमलात येत नाहीत. ही पोकळी भरून काढण्यासाठीच या बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ऑल इंडिया जैन कॉन्फरन्स नवी दिल्लीचे राष्ट्रीय मंत्री वसंत लोढा यांनी दिली.



जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक कुंदा गोडे व वसंत लोढा, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य ॲड. राजेंद्र बलदोटा, ईश्वर बोरा, नितीन पटवा, लिपिक फरहान पटेल यांच्यामध्ये विविध विषयावर बैठक झाली.

जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक कुंदा गोडे व वसंत लोढा, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य ॲड. राजेंद्र बलदोटा, ईश्वर बोरा, नितीन पटवा, लिपिक फरहान पटेल यांच्यामध्ये विविध विषयावर बैठक झाली.

महामंडळाच्यावतीने जैन समाजातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, चार्टर्ड अकौंटंट, एलएलबी, आणि परदेशातील उच्च शिक्षणासाठी ३० लाख रुपयांपर्यंत शैक्षणिक कर्ज मंजूर केले जाते. हे कर्ज ८ लाखपर्यंत उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीला ३ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध होत आहे, कर्ज परतफेडीच्या सुलभ अटींसह दिले जाते. यामुळे गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थ्यांनाही स्वप्नातील शिक्षण घेण्याची संधी मिळू शकते, अशी माहिती जिल्हा व्यवस्थापक कुंदा गोडे यांनी व्यक्त केली.

महिलांसाठी विशेष योजना गृहउद्योग, बचत गटांना आर्थिक बळ, महिलांच्या सशक्तीकरणासाठी महामंडळ विशेष प्रयत्नशील असून, गृहउद्योग, शिवणकाम, खाद्यपदार्थ निर्मिती, ब्यूटी पार्लर, इ. क्षेत्रात महिला बचत गटांना भांडवली सहाय्य देण्यात येणार आहे. अल्प व्याजदरात आणि सहज अटींमध्ये हे कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. व्यवसायवृद्धीसाठी उद्योजकांना सहाय्य, लघु व मध्यम उद्योगधंदे चालवणाऱ्या जैन बांधवांना व्यवसाय वाढीसाठी भांडवली कर्ज, यंत्रसामग्री खरेदी, दुकानदारांना आर्थिक मदत, नवउद्योगांसाठी स्टार्टअप फंडिंग अशा विविध स्वरूपात मदत करण्यात येणार असल्याची माहिती ॲड. राजेंद्र बलदोटा यांनी दिली.

यामध्ये अर्जाची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, संपर्क कार्यालय, अधिकारी यांचे तपशील, व पात्रतेचे निकष यांची संपूर्ण माहिती पंडित दीनदयाळ पतसंस्था, रंगार गल्ली, जैन ओसवाल पतसंस्था अर्बन बँक रोड, संजीवनी एजन्सी माणिक चौक, कुंदनमल बोरा ज्वेलर्स, श्री साई वेट एजन्सी जुनी वसंत टॉकिज बिल्डिंग येथे देण्यात येणार आहे. जैन ऑल इंडिया कॉन्फरन्सचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या माध्यमातून जैन समाजाचे प्रश्न मार्गी लागत आहे. शासनाच्या योजनांचा लाभ समाजापर्यंत घेऊन जाण्याचे काम केले जाईल, असे मत ईश्वर बोरा यांनी व्यक्त केले.



पुरात अडकलेल्यांना सुखरूप बाहेर काढणाऱ्या स.पो.नि. प्रल्हाद गीतेंचा शौर्य पुरस्काराने गौरव करताना आ.संग्राम जगताप, सचिन जगताप, प्रा.माणिक विधाते, संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, अजिंक्य बोरकर, सुरेश बनसोडे, गोरख दळवी.

# पुरात अडकलेल्यांना सुखरूप बाहेर काढणाऱ्या स.पो.नि. प्रल्हाद गीतेंचा शौर्य पुरस्काराने गौरव

नगर – नगर तालुक्यात २७ मे रोजी झालेल्या अतिवृष्टीने पूरपरिस्थिती निर्माण होवून त्या पुराच्या पाण्यात अडकलेल्या १० जणांना स्वतःच्या जीवाची बाजी लावून सुखरूप बाहेर काढत त्यांचा जीव वाचविणारे नगर तालुका पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांचा आमदार संग्राम जगताप सोशल फौऊंडेशनच्या वतीने शौर्य पुरस्कार देवून गौरव करण्यात आला आहे.

मे महिन्यात जिल्हाभरात अवकाळी पाऊस पडला. २७ मे रोजी झालेल्या अतिवृष्टी मुळे नगर तालुक्यातील कामरगाव, अकोळनेर, सारोळा कासार, खडकी, वाळकी, शिराढोण येथे पुरस्थिती निर्माण झाली. सुमारे ५० ते ६० वर्षांत असा पाऊस झाला नव्हता. या पावसामुळे परिसरातील पूर्वा आणि वालुंबा या नद्यांना महापूर आला होता. खडकी येथे या दोन्ही नद्यांच्या पुराचे पाणी एकत्र आल्याने ते नागरिकांच्या शेतात व घरात घुसले होते. पुरामध्ये अनेक नागरिक अडकले असल्याची माहिती नगर तालुका पोलिसांना मिळाल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते यांनी पोलिस पथकासह तातडीने त्या ठिकाणी धाव घेतली. त्यावेळी तेथे अनेकजण पुराच्या पाण्यात अडकलेले होते.

स.पो.नि. गीते यांनी संकटात पडलेल्या लोकांचा जीव वाचवण्याकरिता दोर उचलून पुढे सरसावले. स्वतःच्या कमरेला दोर बांधून व त्या दोराचे दुसरे टोक पोलला बांधून स्वतःच्या जीवाची पर्वा न करता नदीच्या वाहत्या प्रवाहात उतरले. मोठ्या हिमतीने पाण्यात अडकलेल्या दोघांपर्यंत पोहोचले दोघांपैकी एकाचे दोन्ही पाय मोडलेले होते. गिते यांनी त्यांना हळूहळू पाण्याच्या बाहेर कसेबसे काढले. गिते यांचे धाडस पाहून काही तरुणही मदतीकरता उतरले. व त्यांनी पाण्यात अडकलेल्या सर्व १० लोकांचे जीव वाचवले.

स.पो.नि. प्रल्हाद गिते यांच्या या कामगिरीबद्दल जनमानसातून त्यांचे कौतुक झाले. त्यांच्या या कार्याची चर्चा महाराष्ट्रभर झाली. त्यांच्या या शौर्याबद्दल आमदार संग्राम जगताप सोशल फाउंडेशनच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार संग्राम जगताप, सचिन जगताप, प्रा.माणिक विधाते, संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, अजिंक्य बोरकर, सुरेश बनसोडे, गोरख दळवी यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# मराठा समाजाची लग्नासाठी आचारसंहिता : हुंडा, प्री-वेडिंगला विरोध

### कर्ज काढून लग्न न करण्याचे आवाहन; वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर निर्णय

नगर – पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्येच्या घटनेनंतर समाजमन हादरले असून, तिच्या मृत्यूने केवळ तिच्या कुटुंबीयांनाच नव्हे, तर संपूर्ण समाजाला अंतर्मुख केले आहे. या दुर्दैवी घटनेनंतर लग्नातील हुंडा, मानपान आणि शाही सोहळ्यांच्या प्रथांवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर अहिल्यानगरमधील मराठा समाजाने एक अत्यंत स्वागतार्ह आणि पुरोगामी पाऊल उचलत मोठा निर्णय घेत समाजातून हुंडा हद्दपार करण्याचा विडा उचलला आहे.

अहिल्यानगरमध्ये नुकतीच मराठा समाजाच्या विचारमंचाची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये समाजातील हुंडा आणि बडेजावाच्या विवाह प्रथांविरोधात ठोस निर्णय घेण्यात आला. या बैठकीत एक आचारसंहिता जाहीर करण्यात आली असून, त्यानुसार विवाह साध्या पद्धतीने पार पाडावा, हुंडा किंवा मानपान घेणे-देणे टाळावे, विवाह सोहळा विनाखर्ची व सुसंस्कृत ठेवावा यांसह प्री-वेडिंग शूट आणि अनावश्यक खर्च न करण्याचे नियम या आचारसंहितेत करण्यात आले आहे.

### आचारसंहिता पालन करणाऱ्यांचा सत्कार

विशेष म्हणजे ही आचारसंहिता फक्त भाषणापुरती न राहता प्रत्यक्षात उतरावी, यासाठी ११ सदस्यांची सुकाणू समितीही स्थापन करण्यात आली आहे. ही समिती आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार असणार आहे. या आचारसंहितेचे पालन करणाऱ्या पालकांचा समाजातर्फे सत्कार देखील करण्यात येणार आहे.

### मराठा समाजाच्या लग्न समारंभासाठी आचारसंहिता खालीलप्रमाणे...

लग्न सोहळा (१००/२००) मर्यादित लोकात केला जावा. प्री-वेडिंग प्रकार बंद करावा. केलाच तर तो लग्न सोहळ्यात जाहीर दाखवू नये. कसल्याही परिस्थितीत लग्न वेळेवरच लावावे. लग्नात डीजे नको. पारंपरिक वाद्य, लोक कलावंतांना संधी द्या. कर्ज काढून लग्नात खर्च करू नये. मराठा समाजात लग्नाच्या कर्जामुळेच अनेक आत्महत्या झालेल्या आहेत. नवरदेवापुढे दारू पिऊन नाचणाऱ्या तरुण-तरुणींना पायबंद घालावा. हार घालताना नवरा नवरीला उचलू नका. लग्नात फक्त वधूपिता आणि वरपिता यांनीच फेटे बांधावेत. पाहुण्यांचे फेटे आणि इतर सत्कार बंद करावेत. लग्न, वाढदिवस, उद्घाटन कार्यक्रमात, पुस्तके, झाडाची रोपे किंवा रोख स्वरूपात आहेर करावेत.

लग्नात प्रमुख व्यक्तीच्या हस्ते सोन्याचे दागिने, गाडीच्या चाव्या, वस्तू देऊ नयेत. देखावा करू नये. लग्नात हुंडा देऊ-घेऊ नये. वडिलांची खूपच इच्छा असेल तर मुलीच्या नावावर एफडी करावी. लग्न, साखरपुडा, हळद एकाच दिवशी करा. लग्नानंतर मुलीच्या आईने मुलीच्या संसारात ढवळाढवळ करू नये. मोबाईलचा वापर गरजेपुरताच करावा. पैशासाठी सूनेचा छळ करू नये. समाजातील नव उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या ऐपतीप्रमाणे आर्थिक मदतीचा हात द्यावा. नुसत्या शुभेच्छा नकोत.

जेवणात ५ हून अधिक पदार्थ नकोत. विविध कार्यक्रमानिमित्त होणाऱ्या भोजन प्रसंगी अन्नाची नासाडी टाळण्यासाठी, सुकी भोजन पाकीट व्यवस्था असावी. दशक्रिया विधी पाचव्या दिवशी करा. लग्न आणि दशक्रिया विधीला मान्यवरांचे आशीर्वाद, श्रद्धांजली हा कार्यक्रम बंद करावा. श्रद्धांजलीसाठी गरज वाटल्यास वेगळा विशेष कार्यक्रम घ्यावा. अशी आचारसंहिता असून त्याचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



कोहिनूर आर्ट गॅलरीमध्ये व्यंगचित्रकार घनश्याम देशमुख यांच्या 'बोलक्या रेषा' या खास व्यंगचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# घनश्याम देशमुख यांची 'बोलक्या रेषा' व्यंगचित्र प्रदर्शनी कोहिनूर मॉलमध्ये सुरु

### सर्वांसाठी मोफत प्रवेश

नगर – अहिल्यानगरच्या सावेडी येथील कोहिनूर मॉलमधील कोहिनूर आर्ट गॅलरीमध्ये व्यंगचित्रकार घनश्याम देशमुख यांच्या 'बोलक्या रेषा' या खास व्यंगचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. ३१ मे ते ८ जून या कालावधीत हे प्रदर्शन चालणार असून, प्रवेश सर्वांसाठी मोफत व खुला आहे.

या प्रदर्शनात घरगुती प्रसंग, स्त्रीजीवन, सामाजिक विसंगती, तसेच दैनंदिन जीवनातील हलक्याफुलक्या पण विचारप्रवृत्त करणाऱ्या विषयांवर भाष्य करणारी शेकडो व्यंगचित्रे मांडण्यात आली आहेत. पुण्यातील 'कमर्शियल आर्ट'चे शिक्षण घेतलेले घनश्याम देशमुख १९९० पासून चित्रकारितेत कार्यरत असून, त्यांनी 'बोलक्या रेषा' या विशेष उपक्रमातून व्यंगचित्राच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले आहे.

त्यांच्या चित्रांना फेसबुक आणि सोशल मीडियावर मोठा प्रतिसाद असून ३००० हून अधिक चित्रे त्यांनी डिजिटल स्वरूपात प्रसिद्ध केली आहेत. त्यांनी अनेक मान्यवर लेखकांच्या पुस्तकांसाठी चित्रांकनही केलं आहे. महाराष्ट्रातील विविध शहरांत त्यांनी अनेक व्यंगचित्र प्रदर्शनं यशस्वीपणे सादर केली आहेत. ते नवोदित चित्रकारांसाठी कार्यशाळाही घेत असतात.

'कलाविष्कार ६.०' अंतर्गत आयोजित हे प्रदर्शन कोहिनूर मॉलच्या कला आणि सांस्कृतिक उपक्रमांना दिलेलं समर्थन अधोरेखित करतं. नगरकरांनी, विद्यार्थ्यांनी व चित्रकलेच्या प्रेमींनी ही संधी नक्कीच अनुभवावी. यावेळी घनश्याम देशमुख, अश्विन गांधी, श्वेता गांधी, मनोज गुगळे, प्रमोद कांबळे, स्वाती कांबळे, ऋषी गांधी, नीना गांधी आदि उपस्थित होते

# मनुष्याला रामायण खूप आवडते परंतु त्याची वृत्ती महाभारतासारखी आहे

### ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री यांचे प्रतिपादन; महाभारत कथामृत या ग्रंथाची द्वितीय आवृत्ती प्रकाशन सोहळा उत्साहात

नगर – आपल्या वडीलधाऱ्या व्यक्तीचा गौरव करत जो सन्मान आणि कृतज्ञतेचा आदर्श ठेवला तो, अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत असतो. या कार्यक्रमातून माता-पित्याचा सन्मान, संस्कार आणि सात्विक जीवनाचे महत्त्व प्रभावीपणे उलगडले असून सत्यवान दहिफळे यांनी महाभारत या ग्रंथाचे लेखन करून समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे. मनुष्याला रामायण खूप आवडत असते परंतु त्याची वृत्ती महाभारतासारखी आहे. समाजामध्ये माणुसकीच सर्वश्रेष्ठ आहे, अशा कौटुंबिक कार्यक्रमातून कुटुंबातील मूल्यांचा परिचय होतो. हा कार्यक्रम पाहून डोळ्याचे पारणे फिटले सासू- सासरे आई-वडिलां एवढेच श्रेष्ठ असतात, सुरेश आघाव यांच्यासारखा जावई सर्वांनाच भेटावा, असे ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री म्हणाले.



ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री, महाभारत कथामृत या ग्रंथाची द्वितीय आवृत्ती प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. (छाया – लहू दळवी)

नेवासा तालुक्यातील सोनई, गणेशवाडी या गावात समाजाला दिशा देणाऱ्या आणि संस्काराचे बीज पेरणाऱ्या मा. पोलीस पाटील सत्यवान केरू दहिफळे यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांनी लिहिलेल्या महाभारत कथामृत या ग्रंथाची द्वितीय आवृत्ती प्रकाशन सोहळा कार्यक्रमाचे जावई सुरेश आघाव व मुलगी प्राजक्ता आघाव यांच्या वतीने एक अद्वितीय आणि प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन माऊली संकुल येथे करण्यात आले होते. यावेळी माता पित्याचे पूजन सोहळा झाला. यावेळी ह.भ.प आदिनाथ महाराज शास्त्री, आमदार संग्राम जगताप, जिल्हाधिकारी पंकज आशिया, साहित्यिक संजय कळमकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, पत्रकार विठ्ठल लांडगे, कौसल्याबाई दहिफळे, सुरेश आघाव, प्राजक्ता आघाव, विक्रम तांदळे, मधुसूदन सारडा, डॉ. गणेश बडे, डॉ. रंगनाथ सांगळे उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, सत्यवान दहिफळे यांनी संस्कार, विचार, धर्म म्हणून पाहिले आणि त्यांनी सत्यात उतरवले आहे. त्यांचे विचार आपल्या सर्वांना पुढे घेऊन जायचे आहे. आई-वडील हेच जीवनामध्ये सर्वश्रेष्ठ आहे, ज्येष्ठांचे विचार समाजाला प्रेरणादायी व दिशादर्शक असतात महाभारत या ग्रंथातून आपली संस्कृती व संस्कार युवा पिढीला नक्कीच कळेल असे ते म्हणाले.

जिल्हाधिकारी पंकज आशिया म्हणाले की, समाजा मूल्यावर चालत असतो आपल्या देशाला महान संस्कृती व परंपरा लाभली आहे. तिचे जतन करण्याचे काम आपल्या सर्वांना करावे लागेल. सुरेश आघाव यांचे सासरे यांनी महाभारत ग्रंथ लिहून समाजाला इतिहासाची उजळणी करून दिली आहे असे ते म्हणाले.

साहित्यिक संजय कळमकर म्हणाले की, महाभारत नावाचा सुरेख ग्रंथ सत्यवान दहिफळे यांनी ब्लॅक अँड व्हाईट टीव्हीवर बघून, महाभारत ऐकूण आपल्या भाषेत लिहिला तो नक्कीच समाजाला आवडेल महाभारत ग्रंथ घरात आणले तरी लोक घाबरतात कारण घरात महाभारत सुरू होईल अशी भीती त्यांना वाटते. भावना आणि कर्तव्य यामध्ये कर्तव्य श्रेष्ठ आहे आजही महाभारत जिवंत का आहे कारण ते चित्र आपल्यामध्ये आहे महाभारत आपल्याला काय शिकवते तर ते जगण्याचे शिकवते महाभारतातील काही पात्र आपल्यात देखील आहे म्हणून महाभारत जिवंत आहे. आपल्या धर्मामध्ये आता उत्सव करण्याची मोठी सवय लागली आहे सत्यवान दहिफळे गावातील पोलीस पाटील होते त्यामुळे त्यांना महाभारत ग्रंथ लिहिण्यासाठी मदत नक्कीच झाली असेल असे ते म्हणाले.

सुरेश आघाव म्हणाले की सत्यवान दहिफळे व कौसल्याबाई दहिफळे सासू-सासरे यांनी आई-वडिलांप्रमाणे प्रेम केले त्यांनी लिहिलेल्या महाभारत कथामृत या ग्रंथाची द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन त्यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवानिमित्त करण्यात आले. त्यांनी त्याकाळी टीव्हीवरील महाभारत हिंदी या भाषेत पाहून मराठीत त्याचे लिखाण केले. यावेळी मुलगी प्राजक्ता आघाव यांनी आपल्या वडिलांचा परिचय करून दिला

यावेळी सत्यवान दहिफळे यांनी महाभारत ग्रंथ लिहिताना आलेल्या अडचणी व त्यावर केलेली मात याबाबत सविस्तर अनुभव सांगितले व सर्वांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुभाष कुटे, धनंजय सांगळे, आदिनाथ दहिफळे, बाळासाहेब दहिफळे, बाळासाहेब आघाव यांनी परिश्रम घेतले.

# क्रिएटिव्ह टॅलेंट समर कॅम्पचा उत्साही समारोप

### बालकांनी सादर केल्या बहारदार कला सादरीकरणे

नगर – शहरातील सावेडी उपनगरामध्ये गेल्या पंधरा वर्षांपासून स्नेहालयच्या उडान प्रकल्प आणि युवा सोशल सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित केला जाणारा 'क्रिएटिव्ह टॅलेंट समर कॅम्प' यंदाही २०२५ मध्ये उत्साहात पार पडला. सावेडी उपनगरासह शहरातील विविध भागांतील बालकांनी या ११ दिवसांच्या कॅम्पमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या समर कॅम्पचा समारोप सोहळा चेतना लॉन, छत्रपती संभाजीनगर रोड येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळासाहेब पवार होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आकाश त्रंबके, विजय साबळे, प्रवीण कदम, महेश सूर्यवंशी, संदीप क्षीरसागर, नितीन वावरे, गौरव राऊत, योगीराज धामणे, माजी नगरसेवक विनीत पाऊलबुद्धे, रूपालीताई वारे, भाऊसाहेब गोंधळी (अध्यक्ष, समर्पण सेवा फाउंडेशन), विनोद सापा (महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती), तन्वी मांढरे (ओम नाद संगीत विद्यालय) यांची उपस्थिती लाभली.



क्रिएटिव्ह टॅलेंट समर कॅम्पच्या समारोपप्रसंगी बालकांनी बहारदार कला सादर केली. (छाया विजय मते)


कार्यक्रमादरम्यान बाळासाहेब देशमुख यांच्या संकल्पनेतून वृक्ष संवर्धन आणि प्लास्टिक मुक्त भारत या विषयावर आधारित 'गणपती बाप्पा मोरया' ही प्रभावी एकांकिका सादर करण्यात आली. याशिवाय, स्नेहालय संस्थेच्या विद्यार्थ्यांनी संगीता सानप यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्यप्रयोगही सादर केला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी देविदास गुडा, भाऊसाहेब बडे, राजेंद्र नागुल, ओम दोता, संदीप करोलिया, भाऊसाहेब गोधळी, रेश्मा पवने, जगदीश सांगळे, समीक्षा रचा, प्रज्ञा अष्टेकर, श्वेता जाधव, साक्षी जाधव, समर्थ खोमणे, शिवम गायकवाड, राजवीर कुडीया यांनी विशेष मेहनत घेतली.

गेल्या १० वर्षांपासून या कॅम्पचे सातत्याने आयोजन करणारे आणि सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले योगेश पिंपळे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. समर कॅम्पमधून बालकांच्या कलागुणांना बहर मिळाल्याने पालक आणि उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे कौतुक केले.

# छत्रपती संभाजी महाराज समाजरत्न पुरस्काराने नगर येथील पोपटराव (नाना) साठे सन्मानित

नगर – सार्वजनिक बांधकाम विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी पोपटराव (नाना) धोंडीबा साठे यांना छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात खासदार निलेश लंके यांच्या हस्ते साठे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी संमेलनाच्या अध्यक्षा सरोज आल्हाट, साहित्यिक भारत सातपुते, संमेलनाचे संयोजक व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, कवी संमेलनाचे अध्यक्ष रज्जाक शेख, बाळासाहेब देशमुख, ॲड. रामदास सुर्यवंधी आदी उपस्थित होते.



पोपटराव (नाना) साठे छत्रपती संभाजी महाराज समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करताना खा. निलेश लंके आदी.

पोपटराव (नाना) साठे मागील अनेक वर्षापासून सामाजिक कार्यात सक्रीय योगदान देत आहे. धार्मिक व सामाजिक क्षेत्रात त्यांचे कार्य सुरु असून, उपेक्षीत घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ते विशेष कार्य करत आहे. या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. खासदार लंके यांनी साठे यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

# दोन टक्के हिंदू, तरी साजरे होतात सर्व सण

विविध देशांमध्ये त्यांच्या आगळ्या वेगळ्या संस्कृती आणि प्रथा असतात. इंडोनेशियात या देशात फक्त दोन टक्के हिंदू असूनही तिथे रामभक्त आहेत आणि रामायणही सादर केलं जातं. इथे दिवाळीही उत्साहात साजरी केली जाते.

इंडोनेशिया हा जगातील तिसरा सर्वाधिक मुस्लिम लोकसंख्या असलेला देश आहे; परंतु असं असूनही, इथे हिंदू धर्माचं पालन केलं जातं. सुमारे ८९ टक्के मुस्लिम लोकसंख्या असलेल्या या देशात रामायण नृत्यनाट्य सादर केलं जातं. आजही इथे हजारो मंदिरं अस्तित्वात आहेत. इथे दररोज रामलीला कार्यक्रम आयोजित केला जातो. इंडोनेशियामध्ये रामलीलेकडे सांस्कृतिक वारसा म्हणून पाहिलं जातं. इंडोनेशियातील बाली बेटावर रामलीला कार्यक्रम इतक्या थाटामाटात साजरा केला जातो, की रस्त्यांवर होणारा उत्सव पाहण्यासारखा असतो. इथले मुस्लिम कलाकार राम, सीता आणि हनुमानाच्या पात्रांना जिवंत करतात.

*** रामायण पाहण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक**

दिवाळीच्या काळात इथला थाटामाट पाहण्यासारखा असतो. इंडोनेशियन जावा बेटावरील प्रम्बानन हिंदू मंदिर परिसर रामायणाच्या चित्रणासाठी प्रसिद्ध आहे. रामायण पाहण्यासाठी केवळ भारतीय किंवा स्थानिक लोकच नाही, तर जगभरातील पर्यटक इथे येतात. रामायण वाल्मिकी ऋषींनी रचलं असलं तरी रामायणाच्या ३०० हून अधिक आवृत्त्या आहेत.

* रामकीन शहरात होणाऱ्या रामायणाच्या सादरीकरणाला राम कीन म्हणतात. रामकीन हे एक प्रकारचं नृत्यनाट्य आहे. ते पूर्णपणे रामायणावर आधारित आहे. रामायणातील पात्रांची नावं थोडी बदलली आहेत. रामायण नृत्यनाट्य १९७१ मध्ये सुरू झाले आणि ही परंपरा आजही सुरूच आहे. जगातील सर्वात जास्त काळ चालणारं नृत्यनाट्य म्हणून त्याचं नाव 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये नोंदवलं गेलं आहे. बाली, पश्चिम पापुआ, सुलावेसी आणि सुमात्रा या ठिकाणी दिवाळी मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते. त्याचप्रमाणे इंडोनेशियामध्ये ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांची मंदिरंही आहेत. इथल्या प्रत्येक परिसरात एक हिंदू मंदिर आहे. इंडोनेशियातील मंदिरं दक्षिण भारतातील मंदिरांप्रमाणेच बांधली जातात. इथे सुमारे दीड हजार मंदिरं असल्याचं सांगितलं जातं. इथे राम आणि सीता दगडी कोरीवकामात किंवा रामायणाच्या अभिनयात असे सर्वत्र आढळतात.





# सर्पदंशाचे रॅकेट

मध्य प्रदेशातील सिवनी जिल्ह्यात सर्पदंश घोटाळा समोर आला आहे. या घोटाळ्यात प्रशासकीय व्यवस्थेतील निष्काळजीपणा आणि भ्रष्टाचार उघडकीस आला आहे. या घोटाळ्यात ४७ मृत व्यक्तींच्या नावावर वारंवार सर्पदंश झाल्याचे दाखवून पैसे काढण्यात आले आहेत.

फक्त एका जिल्ह्यातूनच सर्पदंश पीडितांना ११ कोटी रुपयांची कागदी भरपाई देण्यात आली आहे. सिवनी येथील एका व्यक्तीला ३८ वेळा सापाने दंश केला आणि प्रत्येक वेळी त्याच्या नावावर ४-४ लाख रुपये काढले गेले. मध्य प्रदेशात सापांची मोजणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मृत व्यक्तींच्या नावावर मृत्यू प्रमाणपत्र, पोलिस पडताळणी आणि शवविच्छेदन अहवालाशिवायच बिल पास केले गेले.

मध्य प्रदेश सरकार सापाच्या दंशामुळे मृत्यू झाल्यास ४ लाख रुपयांची मदत देते. रमेश नावाच्या व्यक्तीला ३० वेळा वेगवेगळ्या घटनांमध्ये मृत घोषित केले गेले, तेही प्रत्येक वेळी सापाच्या दंशामुळे. असे करून भ्रष्ट अधिकाऱ्यांनी १ कोटी २० लाख रुपयांचा गैरव्यवहार केला. इतकेच नाही तर रामकुमार नावाच्या व्यक्तीला सरकारी कागदपत्र दाखवून १९ वेळा मृत दाखवले गेले. हा घोटाळा २०१९ पासून सुरू झाला आणि २०२२ पर्यंत चालला. कमलनाथ सरकारमध्ये सुरू झालेला भ्रष्टाचाराचा सिलसिला शिवराज सरकारपर्यंत चालला.

*** प्रांताधिकारी दोषी**

या घोटाळ्यात तत्कालीन प्रांताधिकारी अमित सिंह आणि पाच तहसीलदारांची भूमिका संशयास्पद आढळली आहे. तपासादरम्यान या अधिकाऱ्यांच्या आयडी आणि अधिकारांचा गैरवापर करून खोटे कागदपत्र तयार केले गेले आणि त्याच आधारावर पैसे पास केले गेल्याचे आढळून आले. आतापर्यंत या संपूर्ण प्रकरणात फक्त सहायक सचिवाला अटक झाली आहे, तर इतर आरोपींवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.



# तरूतुरू चालणाऱ्या 'सिल्व्हर अँट'

तुरूतुरू चालणारी मुंगी तुम्ही पाहिली असेल. या मुंग्यांचा वेग प्रचंड असतो. शास्त्रज्ञांनी जगातल्या सर्वात जलद चालणाऱ्या मुंगीचा शोध लावला आहे. ही मुंगी सहारा वाळवंटात सापडली आहे. ट्युनिशियाच्या दक्षिण भागात या मुंग्या सापडल्या आहेत. या मुंग्यांना 'सिल्व्हर अँट' असं नाव देण्यात आलं आहे. या मुंग्या अवघ्या एका सेकंदात बरंच मोठं अंतर कापतात. शरीराच्या आकारापेक्षा १०८ पट अंतर अवघ्या एका सेकंदात कापणं त्यांना शक्य होतं. या मुंग्या इथल्या रणरणत्या उन्हातही अगदी सहज जिवंत रहातात. त्यांच्या शरीरावरच्या केसांमुळे सूर्याची किरणं परिवर्तित होतात. यामुळे या मुंग्यांना उन्हाच्या झळा लागत नाहीत. या मुंग्या चंदेरी रंगाच्या आहेत. म्हणूनच त्यांना सिल्व्हर अँट असं म्हटलं जातं. या मुंग्या ८५५ मीटर प्रतिसेकंद या वेगाने धावू शकतात. जर्मनीतल्या उल्म विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी या मुंग्यांवर संशोधन केलं आहे. या मुंग्या अन्नाच्या शोधासाठी दुपारच्या टळटळीत उन्हात बाहेर पडतात. या मुंग्यांना सहा पाय असतात. वारा वाहत असताना 'सिल्व्हर अँट' अधिक वेगाने धावतात. तर अशा या 'सिल्व्हर अँट' जगातलं एक आश्चर्यच आहे.

# कॅलिडोस्कोप



# उतारवयात फुललं जुनं प्रेम

असं म्हणतात की पहिलं प्रेम कधीच विसरत नाही. कितीही काळ गेला, तरी पहिलं प्रेम नेहमीच लक्षात राहतं. बिहारमधील पूर्णियामध्येही असंच एक उदाहरण पाहायला मिळालं.

अनेक वर्षांपूर्वी गर्लफ्रेंड आणि बॉयफ्रेंडमध्ये संवाद सुरू झाला. त्यांच्या कुटुंबीयांना हे मान्य नव्हतं. म्हणूनच त्यांची लग्नं वेगवेगळ्या व्यक्तींशी लावून देण्यात आली. बराच काळ लोटला. दोघांना मुलंही झाली. दोघेही आपापल्या कुटुंबात आनंदी होते; पण एका भेटीने सगळं बदललं. एका ६० वर्षीय वकिलाला अचानक त्याची पूर्वाश्रमीची प्रेयसी दिसली, तेव्हा त्याला विश्वासच बसला नाही. व्यवसायाने डॉक्टर असलेली प्रेयसीही तिच्या माजी प्रियकराला पाहून भावूक झाली. दोघेही बोलू लागले. डॉक्टर मैत्रिणीच्या पतीला हे कळलं. तो या नात्याला विरोध करू लागला.

एके दिवशी त्याची पत्नी तिच्या माजी प्रियकरासह पळून गेली होती. तथापि, ही एक हायप्रोफाइल केस असल्याने, पोलिस सक्रिय झाले आणि पुन्हा एकदा दोघे एकमेकांपासून वेगळे झाले. आता ही प्रेमकहाणी परिसरात चर्चेचा विषय बनली आहे.

**मुले मोठी, तरी..**

ते दोघे पळून गेल्यावर महिला डॉक्टरच्या पतीने वकिलाविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल केली. त्या महिला डॉक्टरचा नवराही डॉक्टर आहे. त्याला दोन मुलं आणि एक मुलगी आहे. दोन्ही मुलं एमबीबीएसचं शिक्षण घेत आहेत, तर मुलगी स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहे.

*** साठ वर्षांनी पुन्हा प्रेमात**

महिला डॉक्टर आणि वकील तरूणपणी एकमेकांच्या प्रेमात होते. त्या वेळी दोघेही दिल्लीत एकत्र शिकत होते. कुटुंबियांना त्यांच्या प्रेमाबद्दल कळलं तेव्हा त्यांनी या नात्याला नकार दिला. दोघांच्याही कुटुंबीयांनी त्यांचे लग्न वेगवेगळ्या ठिकाणी केले. महिला डॉक्टरला एक डॉक्टर नवरा मिळाला. वकिलालाही त्याचा जीवनसाथी सापडला. दोन्ही कुटुंबं आनंदाने राहत होती. दरम्यान, एका दिवशी महिला डॉक्टरला अचानक तिचा प्रियकर भेटला. या भेटीत तरूणपणीचे दिवस आठवलं आणि दोघांमधील प्रेम पुन्हा फुलू लागलं. महिला डॉक्टरच्या पतीला हे कळलं तेव्हा त्याने विरोध केला. परंतु वकील त्या महिला डॉक्टरला गुप्तपणे भेटत राहिला. गेल्या आठवड्यात पती क्लिनिकमध्ये जाताच महिला डॉक्टर तिच्या प्रियकरासह पळून गेली. २४ तासांच्या आत सहरसा येथे दोघांनाही शोधून काढण्यात आलं.

*** डॉक्टर महिलेने ओलांडल्या मर्यादा**

क्लिनिक सोडून घरी पोहोचलेल्या डॉक्टरने पत्नीच्या प्रियकरावर गुन्हा दाखल केला. हे प्रकरण खूप गाजलं. पोलिसांनी दोघांच्याही मोबाईलवर पाळत ठेवली. महिला डॉक्टरच्या पतीने पोलिसांना सांगितलं, त्याने पत्नीच्या प्रियकराला घरी येण्यापासून अनेक वेळा रोखलं होतं. परंतु ती क्लिनिकमधून बाहेर पडताच तो घरी पोहोचत असे. या मुद्द्यावरून त्याने त्याच्या पत्नीशी अनेक वेळा भांडण केलं. त्याच्या पत्नीशी झालेल्या भांडणाच्या वेळी मुलं मध्यस्थी करत. या वेळी मात्र पत्नीने सर्व मर्यादा ओलांडल्या आणि प्रियकरासोबत पळून गेली. मात्र पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेतलं आहे.




# उत्सव जुळ्या मुलांचा

नायजेरियामध्ये 'इग्बो ओरा' नावाचं शहर आहे. या शहराला जुळ्या मुलांची राजधानी असं म्हटलं जातं. कारण जगातली सर्वाधिक जुळी मुलं इथेच जन्माला येतात. म्हणूनच इथे जुळ्यांच्या उत्सवाचं आयोजन केलं जातं. या उत्सवात जगभरातली जुळी भावंडं सहभागी होतात. लहान बाळांपासून १०० वर्षांच्या आजीआजोबांपर्यंत विविध वयोगटातली भावंडं इथे पहायला मिळतात. एका अहवालानुसार अमेरिकेत प्रत्येकी हजार मुलांमागे ३३ जुळ्या मुलांचा जन्म होतो. मात्र इग्बो ओरामध्ये जन्म घेणाऱ्या एक हजार मुलांमधली ५० मुलं जुळी असतात. इग्बो ओरामध्ये जुळ्या मुलांच्या जन्माचं प्रमाण एवढं अधिक का आहे, याबाबत संशोधन सुरू असून याबाबत फारशी माहिती हाती आलेली नाही. इथल्या महिलांच्या आहारविहाराच्या सवयींमुळे जुळ्या मुलांचा जन्म होत असल्याचं स्थानिकांचं म्हणणं आहे. मात्र शास्त्रज्ञांनी याबाबत शंका उपस्थित केली आहे. त्यामुळे या भागात एवढ्या मोठ्या प्रमाणावर जुळी मुलं का जन्म घेतात, हे एक गूढच आहे.



# हेअर बँकेत जपून ठेवा केस

ब्लड बँकेबद्दल तर आपण जाणतोच. या ब्लड बँकेत लोकांनी दान केलेलं रक्त साठवून ठेवलं जातं. हे रक्त आवश्यकतेनुसार विविध रुग्णालयांमध्ये पुरवलं जातं. याच धर्तीवर मँचेस्टरमध्ये एक हेअर बँक सुरु करण्यात आली आहे. सध्या केस गळण्याचं प्रमाण वाढत चालल्यामुळे बऱ्याच लोकांना टक्कल पडतं. हे टक्कल पडल्यानंतर अनेक जण केशरोपण करून घेतात. या हेअर बँकेत आपण आपले केस फ्रीज करून ठेऊ शकतो. टक्कल पडू लागल्यावर हेच केस केशरोपणासाठी वापरता येऊ शकतात. केस फ्रीज करण्यासाठी भारतीय चलनात दोन लाख ३० हजार रुपये खर्च येईल. या हेअर बँकेमुळे पुरुषांना अधिक लाभ होणार आहे. पुरुषांमध्ये टक्कल पडण्याच्या समस्येत वाढ होत चालली आहे. या ब्लड बँकेमुळे टक्कल पडू लागल्यानंतर पुरुष मंडळी अगदी सहज केशरोपण करून घेऊ शकतील. ब्रिटनमध्ये जवळपास ६५ लाख पुरुषांना टक्कल पडलं आहे. हेअर बँकेतले केस उणे १८० अंश सेल्सियस तापमानात फ्रीज करून ठेवण्यात येणार आहेत. हेअर बँकेत केस फ्रीज करून मग त्यांचं केशरोपण करण्याचा खर्च प्रचंड असेल. मात्र हा अनोखा उपक्रम आहे, असंच म्हणावं लागेल.

# हाताचे चुंबन घेण्याची प्रथा

आपला देश विविधतेने नटलेला आहे. सर्व धर्म, पंथाळचे लोक इथे राहतात. त्यामुळे विविध प्रथा परंपरा आपल्याला पाहायला मिळतात. राजस्थानमध्येही अशा अनेक परंपरा आहेत. या परंपरांमुळे राजस्थानला 'रंगीला राजस्थान' म्हणून ओळखलं जातं. कारण इथल्या प्रत्येक प्रदेशाचे स्वतःचे वेगळे रीतिरिवाज आहेत. एकीकडे पाय दाबून स्वागत करणं हा राजस्थानच्या संस्कृतीचा एक भाग आहे, तर दुसरीकडे हाताचं चुंबन घेऊन आदर दाखवण्याची प्रथा आहे.



राजस्थानमधील पाली जिल्ह्यातील संदेराव गावात रबारी समुदायाचे लोक राहतात. त्यांची एक अनोखी परंपरा आहे. त्यात मोठ्यांपासून ते लहान मुलांपर्यंत सर्वजण आदर दाखवण्यासाठी हाताचं चुंबन घेतात. परदेशात हे सर्वसामान्य आहे. पण आपल्याकडे अजून ही प्रथा रुजली नाही. राजस्थानमध्ये एकीकडे महिला त्यांच्या वडिलधाऱ्यांसमोर येताना चेहरा झाकतात, तर दुसरीकडे पाली येथील रबारी समुदायाचे लोक स्वागत करण्यासाठी एकमेकांच्या हातांचं चुंबन घेतात. पुरुष आणि स्त्रिया दोघांचाही यात समावेश असतो.

*** विदेशी संदर्भ**

मध्ययुगीन युरोपमध्ये हाताचं चुंबन घेणं हे सौजन्य आणि आदराचं लक्षण होतं. हे विशेषतः उच्चवर्गीय आणि राजघराण्यांमध्ये प्रचलित होतं. पुरुष अनेकदा विशेषतः उच्च वर्गातील स्त्रियांच्या हाताचं चुंबन घेऊन आदर किंवा निष्ठा दाखवत असत. ही प्रथा प्रेमसंबंध, भक्ती किंवा सामाजिक प्रतिष्ठेतील फरक दर्शवणारी होती. ही पद्धत पोलंड, फ्रान्स, इटली आणि रशियासारख्या देशांमध्ये विशेष लोकप्रिय होती

*** भारतात हाताचं चुंबन घेण्याची प्रथा**

भारतात हाताचं चुंबन घेण्याची प्रथा काही प्रमाणात युरोपीयन संस्कृतीच्या प्रभावामुळे पाळली जाते. ही प्रथा भारतीय संस्कृतीत तितक्या खोलवर रुजली नाही. भारतीय संस्कृतीत, आदर दर्शविण्यासाठी नमस्कार करणं, पायांना स्पर्श करणं किंवा डोकं टेकवणं या प्रथा अधिक प्रचलित आहेत. काही समुदायांमध्ये विशेषतः शहरी आणि पाश्चात्य प्रभाव असलेल्या भागात हातांचं चुंबन घेणं हे प्रेम किंवा सौजन्याचं लक्षण मानलं जातं. एखाद्याला ही पद्धत स्वीकारायची असेल, तर त्याने दुसऱ्या व्यक्तीची संमती आणि सांस्कृतिक संवेदनशीलता लक्षात घेतली पाहिजे.

# ड्रग्ज तस्करीत मांजर!

मानवाला या पृथ्वीवरील सर्वात स्वार्थी प्राणी म्हटले, तर त्यात काहीही चुकीचे नाही. कारण तो स्वतःच्या फायद्यासाठी कोणाचाही चुकीच्या गोष्टीचा वापर करू शकतो. कधीकधी माणूस स्वार्थात इतका आंधळा होतो, की तो प्राण्यांचा चुकीच्या पद्धतीने वापर करण्यासही मागेपुढे पाहत नाही. यासंदर्भातील एक घटना उघडकीस आली आहे.

* तुरुंगात ड्रग्ज पुरवण्यासाठी मांजरींचा वापर केला जातो. मध्य अमेरिकेतून हे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. मध्य अमेरिकेतील कोस्टा रिका येथील तुरुंगात ड्रग्जची तस्करी करण्यासाठी मांजराचा वापर केला जात असे. तुरुंग प्रशासनाने एका मांजराला ड्रग्जचे पॅकेट बांधलेले असताना पकडले. ही घटना पाहिल्यानंतर तुरुंगातील कैद्यांनी खेळलेला खेळ आहे, असे वाटले; परंतु सत्य उघड झाले तेव्हा सर्वांनाच धक्का बसला.



*** चौकशी सुरू**

मांजराला असे पाहिल्यानंतर लोकांनी चौकशी सुरू केली. हे एखाद्या संघटित तस्करी टोळीचे काम आहे का, यात तुरुंगातील कैदी आणि बाहेरील नेटवर्क गुंतलेले आहे का, याचा शोध पोलिस घेत आहेत. याशिवाय, या पॅडीज नेटवर्कमध्ये प्राण्यांचा वापर ड्रग्ज तस्करीसाठी करण्यात एखादा कैदी सामील आहे का, हेही शोधण्याचा पोलिस प्रयत्न करत आहेत.

# नगरमध्ये गावठी कट्टा बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पकडले


गावठी कट्टा बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पकडल्यानंतर त्याच्यासमवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

नगर – काही तरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने गावठी कट्टा बाळगणाऱ्या एकास कोतवाली पोलिसांनी सापळा रचून शिताफिने पकडले. ही कारवाई शहरातील क्लेरा ब्रुस हायस्कूलच्या मैदानात ३ जून रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. बिरज्या उर्फ बिरजू राजू जाधव (वय २९, रा. पाटील हॉस्पिटलच्या पाठीमागे, कोठी) असे या सराईत गुन्हेगाराचे नाव आहे.

याबाबतची माहिती अशी की शहरातील क्लेरा ब्रुस हायस्कूलच्या मैदानात एक तरुण काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने गावठी कट्टा कंबरेला लावून फिरत आहे, अशी माहिती कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना समजली. त्यामुळे त्यांनी तात्काळ पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, पोलीस अमंलदार रोहिणी दरंदले, दीपक रोहकले, तानाजी पवार, सुरज कदम, राम हंडाळ, सचिन लोळगे महेश पवार, प्रतिभा नांगरे यांचे पथकाला कारवाईसाठी पाठविले. या पथकाने क्लेरा ब्रुस हायस्कूलच्या मैदानात जावून संशयिताचा शोध घेतला असता त्यांना बिरज्या जाधव हा कंबरेला गावठी कट्टा लावून फिरताना दिसला. पोलिसांनी त्यास पकडून त्याच्या कडून १ गावठी कट्टा व ३ जिवंत काडतूसे असा ४० हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पो. कॉ. सुरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बिरज्या जाधव यांच्याविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी बिरज्या जाधव हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर कोतवाली आणि भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे ९ गुन्हे दाखल आहेत.

## अहिल्यानगरमध्ये ५ ते ९ जून दरम्यान 'Lock The Box Book Fair' या पुस्तक प्रदर्शन

नगर – कोहिनूर मॉल, अहिल्यानगर येथे ५ ते ९ जून २०२५ दरम्यान 'Lock The Box Book Fair' या पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. Bookchor यांच्या सहकार्याने होणाऱ्या या प्रदर्शनात ५ लाखांहून अधिक इंग्रजी, हिंदी आणि मराठी पुस्तके उपलब्ध असून सर्व वयोगटांतील वाचकांसाठी ही एक पर्वणी आहे. Lock The Box ही अनोखी संकल्पना आहे जिथे ग्राहकांना एका ठराविक दरात बॉक्समध्ये जास्तीत जास्त पुस्तके भरून घेण्याची संधी मिळते. यासोबतच 'Sell Your Books Get Paid' उपक्रमाद्वारे लोकांना त्यांच्या जुन्या पुस्तकांच्या बदल्यात पैसे कमावण्याचीही संधी आहे. लहान मुलांसाठीच्या गोष्टींपासून ते प्रौढांसाठीच्या कादंबऱ्या, आत्मचरित्रे, थरारक कथा, विज्ञान, सामाजिक विषय, शिक्षण, करिअर आणि मोटिवेशनसारखी विविध प्रकारची पुस्तके येथे उपलब्ध आहेत.

दररोज सकाळी ११ ते रात्री १० वाजेपर्यंत हे प्रदर्शन खुले असून सर्व पुस्तकप्रेमींनी नक्कीच भेट द्यावी आणि वाचनाची ही आनंदयात्रा अनुभवावी.

## जमिनीच्या वादातून २ कुटुंबात कोयते, कुऱ्हाडीने हाणामारी; १३ जखमी तर २८ जणांवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल

नगर – शेतजमिनीच्या वादातून २ कुटुंबात कोयते, कुऱ्हाडी, लाठ्या, काठ्या व लाथाबुक्क्यांनी जोरदार हाणामारी झाली. यामध्ये दोन्ही गटाचे १३ जण जखमी झाले असून परस्पर विरोधी फिर्यादीवरून दोन्ही गटाच्या २८ जणांवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. पारनेर तालुक्यातील लोणी मावळा गावच्या शिवारात २ जून रोजी दुपारी ४ ते ५ वाजण्याच्या कालावधीत ही हाणामारी झाली आहे.

याबाबत पारनेर पोलिस ठाण्यात ३ जून रोजी पहाटेच्या सुमारास एका तासाच्या अंतराने दोन फिर्यादी दाखल करण्यात आल्या. यातील पहिली फिर्याद सौ.पूजा नितीन नायकोडी (वय २६, रा. लोणी मावळा, ता. पारनेर) यांनी दिली असून त्यानुसार सुरज बाबाजी नायकोडी, शुभम शिवाजी नायकोडी, बाबाजी मारुती नायकोडी, शिवाजी मारुती नायकोडी, शंतनू शिवाजी नायकोडी, ओंकार बाळासाहेब नायकोडी, साई बाळासाहेब नायकोडी, उषा बाबाजी नायकोडी, सुमन शिवाजी नायकोडी यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी यातील शिवाजी मारुती नायकोडी, शंतनू शिवाजी नायकोडी या दोघांना अटक केली आहे.

तर सौ.सुवर्णा रामदास नायकोडी (वय २९, रा. लोणी मावळा, ता. पारनेर) यांनी दिलेल्या फिर्यादी वरून सावकार गणपत नायकोडी, पोपट गणपत नायकोडी, सयाजी पोपट नायकोडी, बाळशीराम पोपट नायकोडी, नितीन सावकार नायकोडी, जिजाबाई पोपट नायकोडी, नंदा बाळशीराम नायकोडी, काजल सयाजी नायकोडी, पूजा नितीन नायकोडी, गणपत दगडू नायकोडी, अंजनाबाई गणपत नायकोडी, झुंबर सावकार नायकोडी, तनुजा बाळशीराम नायकोडी, सृष्टी बाळशीराम नायकोडी (सर्व रा.लोणी मावळा, ता.पारनेर), सारजाबाई सोपान नरसाळे, विजय सोपान नरसाळे, आदिनाथ सोपान नरसाळे (रा.शिरापूर, ता.पारनेर), शिवाजी चोरे, नितीन बिबवे (रा.टाकळी हाजी, ता.शिरुर) या १९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील सावकार गणपत नायकोडी यास अटक करण्यात आली आहे.

लोणी मावळा शिवारात गट नं.७९६ मध्ये कडवळ कापत असताना या शेतजमिनीच्या मालकीवरुन दोन्ही गट हातात कोयते, कुऱ्हाडी, लाठ्याकाठ्या घेऊन एकमेकांना भिडले. या झालेल्या तुफान हाणामारीत एका गटातील सुवर्णा रामदास नायकोडी, शंतनू शिवाजी नायकोडी, शिवाजी मारुती नायकोडी, बाबाजी मारुती नायकोडी, बाळासाहेब बन्सी नायकोडी तर दुसऱ्या गटातील सयाजी पोपट नायकोडी, पोपट गणपत नायकोडी, बाळशीराम पोपट नायकोडी, नंदा बाळशीराम नायकोडी, सागर सयाजी नायकोडी, पूजा नितीन नायकोडी, नितीन सावकार नायकोडी, तनुजा बाळशीराम नायकोडी हे जखमी झाले आहेत. जखमींवर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक नितीन खंडागळे व पोलिस उपनिरीक्षक रणजित मारग हे करीत आहेत.

## ५ ठिकाणी चोऱ्या, घरफोड्या करणारी चौघांची टोळी पकडली

### आरोपींकडून २ लाख ८४ हजारांचा मुद्देमाल जप्त


चोऱ्या, घरफोड्या करणारी टोळी पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर – नगर तालुक्यातील निमगाव वाघा तसेच पारनेर, कर्जत व श्रीगोंदा तालुक्यात ५ ठिकाणी चोऱ्या, घरफोड्या करणारी चौघांची टोळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडली आहे. तर या टोळीतील आणखी तिघे जण फरार आहेत. पकडलेल्या आरोपींकडून पोलिसांनी चोरीतील २ लाख ८४ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथील जयंत महादु केदार यांच्या घरातून २३ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री अज्ञात चोरट्यांनी सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली होती. याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याचा समांतर तपास करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांनी पोलीस अंमलदार दत्तात्रय हिंगडे, बापुसाहेब फोलाणे, फुरकान शेख, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, बाळासाहेब खेडकर, सुनिल मालणकर, प्रशांत राठोड व अरूण मोरे यांचे पथक नेमलेले होते.

सदर पथक ३ जून रोजी या गुन्हयाचा गोपनीय माहिती व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे तपास करत असताना सदरचा गुन्हा हा चंदया पिंपळ्या भोसले (रा.घोसपुरी, ता.नगर) याने त्याच्या साथीदारासह केलेला असून ते सर्व अरणगाव शिवारात रेल्वे पटरीजवळ थांबले असल्याची माहिती मिळाली.पथकाने मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी सापळा रचुन संशयितांचा शोध घेऊन चंदया पिंपळया भोसले (वय ४७), राकेश चंदया भोसले (वय २१, रा.घोसपुरी, ता.नगर), अर्जुन संभाजी काळे (वय २०), गोपीचंद चंदु काळे (वय १९, रा.कंदर, ता.करमाळा, जि.सोलापूर) यांना पकडले. त्यांच्याकडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा त्याचे साथीदार शकल्या सुरेश भोसले (रा.निपाणी जळगाव, ता.पाथर्डी), सफ्या रूस्तम चव्हाण (रा.निपाणी जळगाव, ता.पाथर्डी), रोहित चाचा भोसले (रा.सय्यदमीर लोणी, ता.आष्टी, जि.बीड) यांचेसह केल्याची माहिती सांगीतली.

ताब्यातील आरोपी चंदया पिंपळ्या भोसले यास विश्वासात घेऊन, आणखी कोठे गुन्हे केले अगर कसे याबाबत विचारपूस केली असता त्याने वरील साथीदारासह अहिल्यानगर, पारनेर, कर्जत व श्रीगोंदा तालुक्यात चोरीचे गुन्हे केले बाबत कबुली दिली. त्याच्या ताब्यातून पोलिसांनी चोरीतील २ लाख ८४ हजार रुपये किंमतीचे ३३.७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने जप्त केले आहे.ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीस जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासह नगर तालुका पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले आहे.

## तपोवन रोडवरील बिंगो जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; २२ हजार ३६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

नगर – विनापरवाना टीव्हीच्या स्क्रीनवर असलेल्या नंबरवर पैसे लावून बिंगो नावाचा ऑनलाईन जुगार अड्ड्यावर तोफखाना पोलिसांनी छापा टाकत एकाला ताब्यात घेतले. त्याच्या कडून २२ हजार ३६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई तपोवन रोड येथे ३ जून रोजी करण्यात आली.

तोफखाना पोलिसांना मिळालेल्या माहितीवरुन पथकाने तपोवन रोडवरील बारा एकर जवळ काका आणि नाना सलून दुकानासमोर असलेल्या बिंगो जुगार अड्ड्यावर छापा टाकला, तेथे एका भिंतीस एक टीव्ही स्क्रीन लावलेली असून त्यासमोर एका टेबलावर एक ते दहा आकडे लावलेला चार्ट दिसला. तेथे काही इसम चार्टवर पैसे लावताना दिसले. पोलिसांची चाहूल लागताच ते तेथून पळून गेले. पोलिसांनी तेथून प्रदीप विष्णू वाघस्कर (वय ४२, रा. निर्मलनगर गजानन कॉलनी अ.नगर) यास ताब्यात घेतले. पोलिसांनी तेथील झडती घेतली असता तेथे १२ हजार रुपये किमतीचा क्रोम कंपनीचा एलसीडी, २ हजार ७६० रुपये रोख रक्कम, ७ हजार रुपये किमतीचा एक सीपीयू, ५०० रुपये किमतीचा की बोर्ड व एक माऊस, फाटलेला १ ते ९ व ० असे आकडे लिहिलेला एक चार्ट, असा २२ हजार ३६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पो.कॉ. सतीश त्रिभुवन यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन प्रदीप वाघस्कर यांच्या विरुद्ध महाराष्ट्र जुगारबंदी कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार सुधीर खाडे करीत आहेत.

## धैर्याची आणि मेहनतीचीच नाही, तर टीमवर्कची आणि सातत्याने घेतलेल्या तयारीची फलश्रुती

### दादासाहेब सत्रे यांचे प्रतिपादन; अहिल्यानगरच्या श्रीराम ग्रुपचा ऐतिहासिक कामगिरी; इंडियन आर्मी हिस्टोरिक रनमध्ये ४२ किलोमीटर विभागात १३ रनर्सने पूर्ण केले यशस्वी रन


अहिल्यानगरच्या श्रीराम ग्रुपचा ऐतिहासिक कामगिरी करत इंडियन आर्मी हिस्टोरिक रनमध्ये ४२ किलोमीटर विभागात सर्वाधिक १३ रनर्सने पूर्ण केली यशस्वी रन. यशस्वी सर्व सदस्यांचा ग्रुपच्यावतीने सत्कार करण्यात आला.

नगर – श्रीराम ग्रुपच्या १३ सदस्यांनी ४२ किलोमीटर विभागात दाखवलेली कामगिरी ही केवळ त्यांच्या धैर्याची आणि मेहनतीचीच नाही, तर टीमवर्कची आणि सातत्याने घेतलेल्या तयारीची फलश्रुती आहे. इंडियन आर्मी हिस्टोरिक रनसाठी आम्ही मागील सहा महिन्यांपासून कठोर मेहनत घेतली. प्रत्येक सदस्याला योग्य तंत्र, आहार आणि मानसिक तयारी यावर मार्गदर्शन केले. त्यामुळेच त्यांनी ही अविश्वसनीय कामगिरी साध्य केली, असे प्रतिपादन ग्रुपचे मार्गदर्शक दादासाहेब सत्रे यांनी केले.

अहिल्यानगरच्या श्रीराम ग्रुपचा ऐतिहासिक कामगिरी करत इंडियन आर्मी हिस्टोरिक रनमध्ये ४२ किलोमीटर विभागात सर्वाधिक १३ रनर्सने पूर्ण केली यशस्वी रन. यशस्वी सर्व सदस्यांचा ग्रुपच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी दादासाहेब सत्रे बोलत होते. यास्पर्धेत ४२ किलोमीटरसाठी बाळकृष्ण येनगंदुल, सुनिल बुरा, श्रीकांत गोणे, उमेश दिकोंडा, नरेश बुरा, संदिप सापा, सुनिल मुत्याल, श्रीशैलम श्रीगादी, किरण वाघचौरे, स्वप्निल अंकम, शुभम पासकंटी, सनी आगरकर, सोमनाथ रोहकले यांनी रन पुर्ण तर २१ किलेमीटरसाठी मनिष मामड्याल, सचिन नराल, तुषार गवते, निखिल धंगेकर, अमोल येनगंदुल यांनी रन पुर्ण केले आणि ग्रुपच्या श्रीकांत वंगारी, अजिंक्य गायकवाड, हरीष काबरा, नरेश चेन्नुर इतर सदस्यांच्या परिवारासहीत १०, ५, ३ किलोमीटरसाठी रन पुर्ण केले.

पुढे बोलतांना दादासाहेब सत्रे म्हणाले की, या सर्व धावपटूंनी आपल्या नावावर आणि श्रीराम ग्रुपवर अभिमानाने प्रकाश टाकला आहे. त्यांच्या मेहनतीतून आणि चिकाटीतून प्रेरणा घेऊन इतरांनीही आरोग्यासाठी आणि खेळासाठी पुढे यावे, हीच इच्छा आहे. पुढील स्पर्धांसाठीदेखील आम्ही तयारी सुरू ठेवणार असून, अशा कामगिरीने आपल्या गावाचे आणि जिल्ह्याचे नाव उज्वल करण्याचा निर्धार आहे.

या प्रसंगी ग्रुपचे प्रमुख बाळकृष्ण यनगंदुल यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले, श्रीराम ग्रुपने नेहमीच खेळ व आरोग्यास प्रोत्साहन दिले आहे. आज आमच्या १३ सदस्यांनी ४२ किलोमीटर अंतर पूर्ण करून अहिल्यानगरचे नाव उज्वल केले आहे. त्यांचा सत्कार करताना आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो. त्यांनी दाखवलेली मेहनत व चिकाटी इतरांसाठी प्रेरणादायी ठरेल. कार्यक्रमात सहभागी सर्व धावपटूंना गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. या वेळी क्रीडा प्रेमी व नागरिक उपस्थित होते.

## केडगाव येथील ओढ्यावरील अतिक्रमणाशी संबंध नाही

### राजकीय हेतूने बदनामीसाठी नाव गोवल्याचा राजेंद्र पठारेंचा आरोप

नगर – केडगाव येथील अंबिकानगरमधील नैसर्गिक ओढ्यावर झालेल्या अतिक्रमणाशी आमचा कुठलाही संबंध नाही, सदर मालमत्ता ही दुसऱ्याच व्यक्तीची असून याबाबत तक्रार करताना विरोधकांनी केवळ राजकीय हेतूने बदनामी करण्यासाठी आमचे नाव गोवले असल्याचा आरोप शिवसेनेचे माजी नगरसेवक विजय पठारे यांचे बंधू राजेंद्र पठारे यांनी केला आहे.

या संदर्भात केडगाव येथील संदीप कोतकर युवा मंचचे अध्यक्ष भूषण गुंड व इतरांनी प्रभारी महापालिका आयुक्त तथा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेवून निवेदन दिले होते. अंबिकानगर परिसरात स्थानिक लोकप्रतिनिधीने ओढा बुजविल्याचा आरोप करत ओढ्याचा नैसर्गिक प्रवाह रोखल्याने केडगावात पूर स्थिती निर्माण झाली, त्यामुळे सदर अतिक्रमणावर कारवाई करावी अशी मागणी केली होती. तसेच या निवेदनात हेमंत ढगे यांनी २०२३ मध्ये केलेल्या तक्रारीनुसार महापालिकेने नगर–पुणे महामार्गावरील केडगाव नेप्ती रस्त्यालगत खलील गॅरेज शेजारी असणारा ओढा बुजवून ते गिळकृंत करण्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती. ओढा बुजवून तेथे बंदिस्त ड्रेनेज लाईनचे पाईप टाकून काम पूर्ण केले असून, सदर ओढा बुजविला असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांना पाहणी दरम्यान निदर्शनास आले. याप्रकरणी प्रभाग अधिकारी यांनी विजय पठारे व राजू पठारे यांना २९ मे २०२४ रोजी संबंधित कागदपत्रे जमा करण्याचे लेखी पत्र दिले होते. मात्र यासंदर्भात देखील कारवाई झाली नसल्याचे ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांचे लक्ष वेधले होते.

या संदर्भात बोलताना राजेंद्र पठारे म्हणाले की, सदर मालमत्ताच आमची नाही तर आम्हाला नोटीस काढण्याचा अधिकार महापालिकेला कोणी दिला. लोकशाहीत तक्रार करणाराला अधिकार असला तरी ज्या मालमत्तेबाबत तक्रार आली, त्याची शहानिशा महापालिकेने करायला हवी. त्या मालमत्तेशी आमचा कुठलाही संबंध नसल्याने आम्हाला कुठलीही नोटीस आलेली नाही. विरोधकांनी केवळ राजकीय हेतूने जनमानसात आमची बदनामी करण्यासाठी आमचा कुठलाही संबंध नसताना आमचे नाव गोवले असल्याचे पठारे यांनी सांगितले. सदरील नैसर्गिक ओढ्यावर ज्यांनी अतिक्रमण केलेले असेल ते महापालिकेने तातडीने काढावे अशी मागणीही पठारे यांनी केली आहे.

## वह्यांचे वाटप करुन दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार


सावली दिव्यांग संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब महापुरे यांच्याकडे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वह्यांचा संच सुपूर्त करताना पै. नाना डोंगरे.

नगर – ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वह्यांचे वाटप करून शैक्षणिक मदतीचा हात पुढे केला. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने सावली दिव्यांग संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब महापुरे यांच्याकडे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वह्यांचे संच सुपूर्त करण्यात आले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क आहे. आर्थिक व शारीरिक अडचणीमुळे कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी संस्थेच्या माध्यमातून हा छोटासा प्रयत्न आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना योग्य सुविधा मिळाल्यास ते निश्चितच उज्वल यश प्राप्त करू शकतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीने अशा गरजू मुलांच्या शिक्षणासाठी पुढे येणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

बाबासाहेब महापुरे म्हणाले की, पै. नाना डोंगरे यांच्यासारखे संवेदनशील लोककार्यकर्ते दिव्यांगांना वेळोवेळी मदतीचा हात देत आहेत. त्यांच्या या मदतीमुळे अनेक दिव्यांग मुलांचा शैक्षणिक प्रवास सुलभ होत आहे. या उपक्रमामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढतो व समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्यास प्रेरणा मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## विळद शिवारात वाळूची चोरटी वाहतूक करणारा ढंपर पकडला

### १२ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त, एमआयडीसी पोलिसांची कारवाई


विळद शिवारात वाळूची चोरटी वाहतूक करणारा ढंपर पकडल्यानंतर त्याच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

नगर – विनापरवाना वाळूचे उत्खनन करुन वाळूची चोरटी वाहतूक करणारा ढंपर एमआयडीसी पोलिसांनी सापळा रचून पकडला. या कारवाईत ढंपर चालकास ताब्यात घेऊन १२ लाख ४० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई ३ जून रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास विळद शिवारातील विळद पाण्याच्या टाकीजवळ केली.

याबाबतची माहिती अशी की स.पो.नि.माणिक चौधरी यांना माहिती मिळाली की, एक ढंपर हा नगर मनमाड हायवेने चोरुन वाळुची वाहतुक करीत आहे. ही माहिती मिळताच त्यांनी पोलिस पथकासह विळद पाण्याचे टाकी जवळ सापळा लावला. काही वेळात राहुरीकडून नगरकडे एक पांढरे केशरी रंगाचा ढंपर येतांना दिसला. तेव्हा पोलिसांनी त्यास थांबण्याचा इशारा केला असता चालकाने ढंपर थांबविला. पोलिसांनी ढंपरची पाहणी केली असता त्यामध्ये वाळु दिसली.

या वाळु वाहतुकीचा परवाना बाबत विचारले असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले. त्यामुळे पोलिसांनी आकाश संदिप रामफळे, (वय २४, हल्ली रा. कारेगाव, ता. शिरुर, जि. पुणे, मुळ रा. मुंगुसगाव, ता. श्रीगोंदा) यास ताब्यात घेतले. तसेच १२ लाख रुपयाचा ढंपर (क्र. एम एच १२ एच डी ४०७०) व ४० हजार रुपये किमतीची ४ ब्रास वाळु असा एकुण १२ लाख ४० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी ढंपर चालक आकाश रामफळे याचे विरुध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात बी एन एस ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई स.पो. नि. माणिक चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार सचिन आडबल, संदीप पितळे, किशोर जाधव, गोरक्षनाथ केदार, अनिल उगलमुगले, अक्षय रोहोकले यांचे पथकाने केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

